## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**सर्व साधारण सभा**

शनिवार दि. ३०.११.२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. सदस्य उपस्थित होते.

**मा.सौ.शैलजा किशोर स्वामी, महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| कुरेशी शफि अहेमद | कदम गंगाबाई नारायणराव |
| सातोलीकर श्रीनिवास आशन्ना | पवळे उमेश देवराव |
| कंठेवाड सविता मारोतराव | बियाणी प्रविण बालाप्रसाद |
| पांढरे स्नेहा सुधाकर | चव्हाण आनंद शंकरराव |
| फारुख अली खा इलियाज खॉ | आनेवार गंगासागर संदिप |
| कल्याणकर बालाजी देविदासराव | भवरे किशोर दामोधर |
| कदम शीला सुनिल | खेडकर प्रमोद मुरलीधरराव |
| कनकदंडें मोहिनी महेशराव | मोकले सोनाबाई रामचंद्र |
| पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश | जाधव जयश्री आनंद |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | जिंदम पार्वती व्यंकटेश |
| उमरेकर अशोक रावण | चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह |
| रजिया बेगम अयुबखान | सलिमा बेगम नुरुल्लाखान |
| देशमूख बाळासाहेब गंगाधरराव | स.इतरत फातेम स.मजहर हुसेन |
| गफारखान गुलाम महमंद खान | अनुजा अमितसिंह तेहरा |
| यादव तुळजाराम गणेशलाल | शर्मा पुष्पाताई राजेश |
| खेडकर ज्योती महेंद्र | राओत्रे संगिता पृथ्वीराज |
| अ.हबीब अ.रहिम बागवान | बिपाशा बेगम स.वलिओध्दीन |
| अ.सत्तार अ.गफुर | स.शेर अली स.महेबुब अली |
| इशरत फातेम अ.शमीम | कुरेशी चॉदपाशा खाजा |
| फारुख हुसेन कासिम साब | कोकुलवार लक्ष्मीबाई तुळशीराम |
| राखेवार सतिष शेषप्पा | चाऊस हसिना बेगम साबेर |
| अ.लतिफ अ.मजिद | जकिया बेगम स.मुखतार |
| गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल | खोमणे सुदर्शना महेश |
| बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला | रावत दिपकसिंह काशिनाथसिंह |
| सोडी गुरुप्रितकौर दिलीपसिंघ | गायकवाड वैजयंती भिमराव |
| मोरे संजय गंगाधरराव | अभिषेक सौदे |
| काकडे सिंधू पांडूरंग | देशमूख मंगला गजानन |
| चिखलीकर स्रंदिप सुभाषराव | प्रा.ललिता मुकूंदराव बोकारे |
| विनय विश्वांभरराव पाटील | जमदाडे करुणा भिमराव |
| घोगरे इंदूबाई शिवाजी | येवनकर विजय हिरांचद |
| कदम विश्वास बालाजी | अड.बन शाम वामनराव |
| काबरा रामनारायण रामदेव | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर **सौ.शैलजा किशोर स्वामी**, या होत्या. तसेच श्री सुशील खोडवेकर, आयुक्त, श्री रमेश नानकराम होतवानी, अधिक्षक अभियंता, भारत स्वच्छता अभियांन, श्री प्रकाश येवले, उपआयुक्त, श्री आर.एस.कोलगणे, मुख्य लेखापरिक्षक, डॉ.असिफ, प्रभारी. मुख्य वैद्याकिय आरोग्याधिकारी, श्री महमंद सादिक, मुख्य लेखाधिकारी, श्री विजय मुंढे, स.आयुक्त आरोग्य,श्री गिरीष कदम, का.अभियंता सा.बा.वि. डॉ.श्री रईसोध्दीन, पशु वैद्यकिय अधिकारी, श्री खुशाल कदम, नगररचनाकार,व महानगरपालिकेचे सर्व सहायक आयुक्त/क्षेत्रिय अधिकारी व इतर सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

सुरवातीस नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामुहिक गित म्हणण्यात आले.

**विश्वास कदम** शहरातील ब-याचश्या नागरीकांनी व्यापा-यांनी नळ कनेक्शनला तोटया बसविलेल्या नसल्यामूळे व पाणी पुरवठा पाईप लाईन लिकेजेस असल्यामूळे मोठया प्रमाणात पाणी वाया जात आहेत.पावसाचे प्रमाण कमी झाल्यामूळे जलाशयात पाण्याचा साठा कमी असल्याने शहरात पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे त्यामूळे ज्या मालमत्ताधारकांनी नळांना तोटया लावलल्या नाहीत त्यांना तोटया बसविण्यासाठी

कळविण्यात यावे व शहरामध्ये ज्या ज्या ठिकाणी पाण्याची गळत्या आहेत त्या त्वरित दुरुस्त करून घेण्यात याव्यात व यासंदर्भात केलेल्या कारवाईचा अहवाल पुढील सभेत ठेवण्यात यावा अशा प्रकारचा ठराव मागील सभेत पारीत करण्यात आलेला आहे परंतु आजच्या सभेत अहवाल देण्यात आलेला नाही. आमच्या भागात १०-१२ लिकेजेस आहेत शारदानगर भागातील पाईप लिकेजेस मूळे २४ तास पाणी वाहून मोठया प्रमाणात पाण्याचा अपव्यय होत आहे. तरी याबाबत खुलासा करण्यात यावा.

**नगरसचिव** श्री विश्वास कदम यांनी मागील सभेत मांडलेल्या प्रस्तावावर झालेल्या निर्णयाचा ठराव पाणी पुरवठा विभागास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेला आहे .पुढील सभेत पाणी पुरवठा विभागा मार्फत करण्यात आलेल्या उपाय योजनाचा अहवाल सादर होईल.

**डॉ.करुणा जमदाडे** आमच्याही प्रभागात पाण्याची समस्या निर्माण झालेली आहे .मोठया प्रमाणात लिकेजेस असल्यामूळे व खाजगी नळाना तोटया नसल्यामूळे पाण्याचा अपव्यय होत आहे. काही ठिकाणी व्हाल्व्ह खराब झाल्यामूळे ५-५ तास पाणी पुरवठा होत असल्यामूळे पाणी वाया जात आहे . लिकेजेसची दुरुस्ती करण्यात यावी. तसेच मलनिस्सारण लाईनही चोकअप झालेल्या त्याही दुरुस्त करणे आवश्यक आहे.

**सजंय मोरे** वसरणी भागात मोठया प्रमाणात लिकेजेस आहे,पाईप लाईन फुटल्यामूळे पाण्याचे प्रेशर कमी होवून उंच भागात भागात पाणी पुरवठा होत नाही याबाबत संबंधित कनिष्ट अभियंता, उपअभियंता यांना तक्रार करुनही ते उडवाउडवीचे उत्तर देत आहे. एएमआरसचे कंत्राटदारही काम करण्यास तयार नाही.मी एक वर्षापासुन प्रत्येक सर्वसाधारण सभेत स्थायी समितीच्या सभेत पाण्याच्या गंभिर विषयावर बोलत आहे परंतु प्रशासन लक्ष देण्यास तयार नाही. स.सदस्य पोटतिडकिने पाणी प्रश्नावर बोलतात त्यावर प्रशासनाने गंभिरतेने लक्ष देवून पाण्याच्या समस्या सोडवाव्यात.

**बालाजी कल्याणकर** आतापासूनच शहरात पाण्याची समस्या निर्माण झालेली आहे अजून उन्हाळा यावयाचा आहे. उन्हाळयात पाणी टंचाई निर्माण होवू नये म्हणून आज पासूनच उपाय योजना सुरु करण्यात याव्यात, प्रशासनाने पाणी प्रश्नावर लक्ष द्यावे.

**रामनारायणजी काबरा** अप्पर पैनंगंगेच्या धरणातील पाणी कालव्याव्दारे घेण्याची पर्यायी योजना मंजुर झालेली असून ती एक महिण्यात पुर्ण होईल असे सांगण्यात येत होते या योजनेचे काम कुठपर्यत आलेले आहे ही योजना केव्हा पुर्ण होणार आहे. विष्णुपूरी जलाशयातील पाणी शेतकरी अनाधिकृतरित्या विद्युत मोटारी व्दारे उपसा करीत आहेत .अशीच परिस्थिती राहिली तर उन्हाळयात पाणी राहणार नाही. जलाशयातील पाण्याचा साठा दिवसे दिवस कमी होते आहे. सध्या जलाशयातील पाण्याचा विचार करता मार्च ,एप्रिल, मे या महिण्यात पाण्याची काय परिस्थिती राहणार आहे. उन्हाळयात पाण्याची टंचाई निर्माण होवू नये म्हणून काय उपाय योजना करण्यात येत आहे. कारण इतिहासात नांदेडला प्रथम पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे आता पर्यत अशी परिस्थिती कधीही निर्माण झाली नव्हती. त्यामूळे पाण्याच्या गंभिर प्रश्नावर काय उपाय योजना करणार आहेत याचा सविस्तर खुलासा सभागृहात देण्यात यावा.

**दिपकसिंह रावत** ब-याचश्या सं.सदस्यांनी पाणी प्रश्नावर चर्चा केलेली आहे. संभाव्य पाणी टंचाई बाबत प्रशासनाची काय भूमिका काय आहे हे स्पष्ट करण्यात यावे तहान लागली की विहीर खोदतो. दरवर्षी ऐनवेळी एप्रिल मे महिण्यात पाणी टंचाईवर सभेत चर्चा करुन दोन दिवसा आड तीन दिवसाड पाणी पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात येतो. मालमत्ताधारकानी पाणी पटटी भरली नाही तर त्यांचे नळ कनेक्शन कट करण्यात येते. उन्हाळयात पाणी परिस्थिती काय राहणार आहे पाणी टंचाई निर्माण होवू नये म्हणून प्रशासनामार्फत काय नियोजन करण्यात येणार आहे प्रशासनाचे आयुक्त व महापौर हे जरी प्रमुख असलेतरी पाणी पुरवठया संदर्भात पाणी पुरवठा विभागाचे उपअभियंता यांनी खुलासा करावयास पाहिजे. पाणी पुरवठा व मलनिस्सारणाची वार्षिक देखभाल व दुरुस्तीचे कामासाठी कंत्राटदार नेमण्यात आलेले आहे परंतु ते काम करीत नाही. पाणी पुरवठा व मलनिस्सारणाचे मेन्टनन्स करीता १२८ मजुर लावण्यात आलेले आहे परंतु त्यांना मेन्टनन्सची कामे न देता कार्यालयात लिपिक, सहायक लिपिक, वसुली लिपीक,शिपाई ई.पदाची कामे देण्यात आलेली आहे.मेन्टनन्सची कामे होत नाही. याबाबत आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

**नवलकुमार पोकर्णा** यापुर्वी स्वेच्छा निधीतून प्रभागात उन्हाळयात पाण्याची टंचाई निर्माण होवू नये म्हणून नगरसेवक स्वेच्छा निधीतून प्रत्येक प्रभागात ५-५ विधन विहिरी घेण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे परंतु त्याची अमलबजावणी झालेली नाही. आमच्या प्रभागात मोठया प्रमाणात पाणी टंचाई असल्यामूळे विंधन विहिरी घेतल्यातर त्या भागातील पाण्याचा प्रश्न सुटू शकेल.त्यामूळे स्वेच्छा निधीतून प्रत्येक प्रभागात ५-५ विधन विहिरी घेण्यासाठी मान्यता देण्यात यावी.

**संजय मोरे** वसरणी व त्यापरिसरातील नगरे हा सर्व ग्रामीण भाग असून याभागात नियमित पाणी पुरवठा करण्यासाठी मी एक वर्षापासुन सर्वसाधारण सभेत मागणी करीत आहोत.,मागील सभेचे इतिवृत्त पहावे अजुन आमच्या भागातील पाण्याचा प्रश्न सुटलेला नाही.नागरीक नियमाप्रमाणे पाणी पटी भरतात परंतु त्यांना पाणी देण्यात येत नाही. आम्हाला बिसलरीचे पाणी नाही पाहिजे.महापौरांनी प्रशासनास शहरातील नागरीकांना पाणी देण्याचे निर्देष द्यावेत.

**सविता कंठेवाड** माझ्या प्रभागातील हनुगड भागात ऐन दिवाळी सणाच्या वेळेस दुषित पाणी पुरवठा झाला होता. यासंदर्भात पाणी पुरवठा विभागास तक्रार केली होती तेव्हा या विभागातील अभियंत्यानी पाहणी केली .मी त्यांना दुषित पाणी पुरवठा होत असल्याबाबत सविस्तर अहवाल मा.आयुक्त साहेबाना सादर करावा असे सांगितले होते .आयुक्त साहेबांकडे अहवाल आलेला आहे काय . मलनिस्सारण पाईप लाईन वरील चेंबर खराब झाल्यामूळे सर्व घाण पाणी रस्त्यावर जमा होवून रस्त्यावर खडडा पडल्यामूळे नागरीकांना रस्ता नव्हता म्हणून पाईप टाकून पर्यायी रस्ता करण्यात आला. पाईप टाकताना तेथील पाणी पुरवठा लाईनला धक्का लागून दोन छिंद्र पडल्यामूळे ड्रेनेजचे पाणी पिण्याच्या पाइपमध्ये जावून नागीकांना दुषित पाणी पुरवठा होत होता.त्यामूळे स.सदस्य जी कामे सांगतात ते गांर्भियाने घेवून ते मार्गी लावणयचा प्रयत्न करावा. ड्रेनेज लाईन पाणी पुरवठा गळत्या दुरुस्त करण्यास काय अडचण आहे याचा खुलासा करण्यात यावा.

**फारुख अली खा** आमचे नेते मा.खा.श्री अशोकरावजी चव्हाण साहेब यांनी नांदेड शहराच्या विकासासाठी रु.२००० कोटीचा निधी मिळवून दिला होता या निधीतून शहरात अनेक विकासाची कामे करण्यात आली त्यातील महत्वाची सुधारीत पाणी पुरवठा व मलनिससारण योजनाची कामे करण्यात आली, पाईप लाईन टाकणे, पाण्याचे टाकीचे बांधकाम या कामावर करोडो रुपये खर्च करण्यात आले ही कामे करुन ७-८ वर्ष झाली परंतु केवळ पाईप लाईनला, पाण्याच्या टाकीला क्रॉस कनेक्शन न दिल्यामूळे नागरीकांना पाण्यापासून वंचित रहावे लागत नाही. एवढया प्रमाणात खर्च करुनही प्रशासनाच्या चूकीमूळे नागरीकाना त्यांचा फायदा होत नाही. क्रास कनेक्शनसाठी देण्यासाठी रु.५०,०००/-सुध्दा खर्च करण्यात येत नाही. आज पर्यत क्रॉस कनेक्शन का देण्यात आलेले नाही याचा खुलासा करण्यात यावा. माझ्या प्रभागातील सहयोगनगर भागात ७-८ वर्षापुर्वी पाणी पुरवठा व मलनिस्सारण लाईन टाकण्यात आली परतु क्रॉस कनेक्शन देण्यात आलेले नाही. नागरीकांनी मलनिस्सारण पाईप लाईन आपल्या घरातील शौचालयाचे कनेक्शन पाईप लाईनला जोडले परंतु पाईपलाईनला क्रास कनेक्शन न दिल्यामूळे मोठया प्रमाणात समस्या निर्माण झालेली आहे. पाईप लाईन टाकण्याचे काम हे पारंगत मिस्त्रीकडुन व्हावयास पाहिजे परंतु ते मजुरांकडून करुन धेण्यात आल्यामूळे पाईप लाईनचा स्लोप निघालेला नसल्याने मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे आणि यास पाणी पुरवठा व मलनिस्सारण विभागाचे अभियंतेच जबाबदार आहे. केवळ क्रास कनेक्शन न दिल्यामूळे नागरीकांना पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे .महापौर साहेबांना माझी विनंती आहे की याप्रकरणात सविस्तर चौकशी करण्यासाठी एक उपसमिती कायम करण्यात यावी.

**रजिया बेगम** सर्व प्रभागात पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. माझ्याही प्रभागातील आंबेडकर नगर भागात दोन वर्षापुर्वी पाईप लाईन टाकण्यात आली परंतु त्यास क्रास कनेक्शन देण्यात आलेले नाही.पाण्याची समस्या खुप गंभिर आहे. महापौरांनी प्रशासनास पाण्याची समस्या तात्काळ सोडविण्याचे आदेश यावेत.

**किशोर भवरे** माझा प्रभाग क्र.८ हा पुर्ण मागासवर्गीयाचा प्रभाग असून रोजमजुरी करुन पोट भरणारे मजुर राहतात त्यांना पाणी मिळत नाही. पाण्यासाठी प्रभागातील ७०-८० नागरीकानी माझ्या घरावर मोर्चा आणला होता. मी पाणी पुरवठा विभागाचे अभियंता श्री अंधारे यांना पाण्याची समस्या सोडविण्यासाठी सांगितले होते त्यानी मला आमदार खासदाराकडून निधीचे पत्र आणण्यास सागितले ही जबाबदारी नगरसेवकांची आहे काय . नागरीकांना पाणी मिळाले पाहिजे, त्यासाठी अगोदर उपाय योजना करण्यात याव्यात. पाणी प्रश्नावर महानगरपालिकेची एक विशेष सभा लावण्यात यावी.

**अ.हबीब** माझ्या प्रभागातील लक्ष्मीनगर भागात दोन वर्षापुर्वी पाणी पुरवठयाची पाईप लाईन टाकण्यात आली आहे परंतु त्या पाईप लाईनला अद्याप क्रॉस कनेक्शन देण्यात आलेले नाही. एवढया मोठया प्रमाणात पैसा खर्च करुनही नागरीकांना पाणी मिळत नाही. याप्रकरणाची चौकशी करण्याकरीता एक उपसमिती कायम करण्यात यावी.

**महापौर** उपसमिती कायम करण्याची आवश्यकता नाही. प्रशासनास वेळ देण्यात यावा. प्रशासन उपाय योजना करीत आहेत.

**विजय येवनकर** आमच्या शिवाजीनगर भागात एक वर्षापासून पाण्याची समस्या आहे याबाबत वारंवार तक्रार करुनही अद्याप समस्या सुटलेली नाही. पाणी पुरवठयावर प्रशासनाने लक्ष द्यावे.

| | |
|---|---|
| **बाळासाहेब देशमूख** | आयुक्त साहेबांनी साईट नं.३४ लालवाडी भागात बिएसयुपी योजने अंतर्गत पाईप लाईन टाकणेसाठी याविभागाचे अभियंता श्री अंधारे साहेबांना आदेश दिले होते परंतु अद्याप पाईप लाईन टाकण्यात आलेली नाही. |
| **प्रमोद खेडकर** | पाणी पुरवठा विभागाचा चार्ज कोणाकडे आहे पाणी पुरवठा विभागाचे अभियंता श्री अंधारे हे सभागृहात दिसत नाही. या विभागाचा चार्ज कोणाकडे आहे. याची महापौरांना माहिती आहे किंवा नाही. |
| **दिपकसिंह रावत** | प्रत्येक प्रभागात पाण्याचा पश्न आहे याचे उत्तर कोण देणार आहे.अधिका-यांनी सर्वसाधारण सभेत उपस्थित रहावयास पाहिजे. |
| **विरेंद्रसिंध गाडीवाले** | आजच्या सभेत जे अधिकारी अनुपस्थित आहेत त्यांचे विरुध्द कार्यवाही कार्यवाही करण्यात यावी. |
| **फारुख अली** | सर्वसाधारण सभेत सर्व अधिकारी उपस्थित असणे आवश्यक आहे.जे अधिकारी अनुपस्थित आहेत त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात यावी. |
| **महापौर** | सर्वसाधारण सभेचे तारीख आठ दिवस अगोदर जाहिर करण्यात येते त्यामूळे सर्व अधिका-यांनी सभेस उपस्थित राहणे आवश्यक आहे. अधिका-यांना कामा निमित्य पुणे, दिल्ली. मुंबईला जावयाचे असल्यास सर्वसाधारण सभेचा दिवस सोडून जावे. सभेला अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घेण्यात यावी. |
| **डॉ.करुणा जमदाडे** | मा.महापौर व आयुक्त साहेबांनी तीन महिण्यापुर्वी मनपा निधीतील व बिएसयुपी, जेएनएनयूआरएम योजने अंतर्गत चालू असलेल्या कामाचे संदर्भात नगरसेवकांची बैठक घेतली होती या बैठकीत आयुक्त साहेबांनी प्राधान्याने बिएसयुपीची ,जेएनएनयुआरएम योजनेतील कामे प्राधान्याने पुर्ण करण्यात येतील असे आश्वासन दिले होते तीन महिणे होवूनही अद्याप कामे झालेली नाही. माझ्या प्रभागातील बिएसयुपी,पाणी पुरवठा व मलनिसारण लाईनची कामे ठप्प आहे ही कामे कैंव्हा पुर्ण होतील याचा खुलासा करण्यात यावा. |
| **बाळासाहेब देशमूख** | माझ्या प्रभागात पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे परंतु क्रॉस कनेक्शन न दिल्यामूळे पाणी पुरवठा कमी होत आहे.क्रॉस कनेक्शन केव्हा देण्यात येणार आहे. |
| **अ.सत्तार** | आमचे नेते खा. श्री अशोकरावजी चव्हाण यांच्या प्रयत्नाने नांदेड शहराच्या विकासासाठी रु.२०००/-कोटीचा निधी मिळाला व या निधीतून पाणी पुरवठा व मलनिससारणाची बिएसयुपीची कामे करण्यात आली.जेएनएनयुआरएम, बिएसयुपी या शासन योजनेची कामे चांगली केल्यामूळे महानगरपालिकेच्या पदाधिकारी व अधिका-यांना अवार्ड दिलेले आहे.जर कामे बोगस आणि चुकीची झालेली असतील तर शासनाने अवार्ड कसे काय दिलेले आहे.आज सभागृहात कामे बोगस झाल्याची तक्रार करण्यात येत आहे. त्यामूळे यासर्व कामाची चौकशी करण्यासाठी एक चौकशी समिति कायम करण्यात यावी. ज्या अधिका-यांनी शासन योजनेतील कामे केली ते अधिकारी आज सभागहात उपस्थित नाहीत त्यांना माहिती होते की स.सदस्य सभागृहात आपणास प्रश्न विचारतील त्यामूळै ते आजच्या सभेस उपस्थित नाहीत. पाणी पुरवठयावर चर्चा व्हावयास पाहिजे. आज विष्णुपुरी जलाशयातून शेतकरी हजारो विद्युत पंम्पाव्दारे अनाधिकृतरित्या पाण्याचा उपसा करीत आहे त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात येत नाही.या सभागृहाने पर्याची १६ कोटीची पाणी पुरवठा मंजुर केलेली आहे व शासनाने त्यास मान्यता दिलेली आहे त्याबध्दल मी सर्व स.सदस्यांचे अभिनंदन करतो. या योजेने काम कुठपर्यत आलेले आहे याचा आयुक्त साहेबांनी खुलासा करावा. शासनाकडून मिळालेल्या रु.२००० कोटीच्या निधीतून जी कामे करण्यात आलेली आहे त्या कामाची चौकशी करण्यासाठी मा.महापौरांच्या अध्यक्षतेखाली उपमहापौर,सभापती ,सर्व पक्षाचे गटनेते यांची एक उपसमिती कायम करण्यात यावी असा माझा प्रस्ताव आहे. गुरु ता गध्दी कार्यक्रमाच्या वेळेस मी स्थायी समितीचा सभापती होतो ,माजी आमदार श्री ओमप्रकाश पोकर्णा हेही कौन्सीलमध्ये होते तेव्हा आम्ही अनेक विकास कामाना मान्यता दिलेली आहे. कामे चांगली व कालावधीत पुर्ण केल्यामूळे शासनाने अवार्ड देवून महानगरपालिकेचा गौरव केलेला आहे .सत्य परिस्थिती समोर येण्यासाठी एक उपसमिती कायम करण्यात यावी. व पुढील सभेत अहवाल देण्यात यावा. |
| **फारुख अली** | मी कोणावरही आरोप केलेला नाही माझे एवढेच म्हणणे आहे की. रु.२००० कोटी खर्च करुनही फक्त क्रॉस कनेक्शन न दिल्यामूळे नागरीकांना त्यांचा फायदा होत नाही. क्रॉस कनेक्शन देण्यासाठी मामुली रु.५०,०००/- खर्च येतो तेंवढाही खर्च करण्यात येत नाही. क्रॉस कनेक्शन दिले तर नागरीकाना त्याचा फायदा होईल.क्रास कनेक्शन देण्यात यावे अशी विनंती आहे. |
| **वैजयंती गायकवाड** | माझ्या प्रभागात एलआयसी कार्यालयाजवळ पाणी पुरवठा पाईप लाईन लिकेज होवून ४ दिवसापासून पाणी रस्त्यावरुन वाहत असून मोठया प्रमाणात पाणी वाया जात आहे. याची तक्रार संबंधित विभागास करुन लिकेजेस दुरुस्त करण्यात आलेले नाही. |

**संजय मोरे** पाणी पुरवठा पाईप लाईन लिकेजेसमूळे ,मलनिस्सारण लाईन चोकअप मूळे पाणी रस्त्यावर वाहत आहे त्याची दुरुस्ती करण्याचे सांगूनही. १०-१५ दिवसातही तक्रारीची दखल घेण्यात येत नाही. प्रभागात साफसफाईची कामे होत नाही अधिकारी आमचे ऐकत नाही आमचे फोन उचलित नाही.

**आयुक्त** अधिकारी कर्मचारी हे आपणा सारखीच मानस आहेत त्यांनाही पर्सनरल लाईफ आहे. ते २४ तास काम करु शकत नाही , कार्यालयीन वेळेत अधिकारी मोबाईल उचलतात ते मोबाइल बंद ठेवीत नाहीत. याचा मला अनुभव आहे.स.सदस्य सकाळी ६.०० वाजेपासून फोन करण्यास सुरवात करतात ही वस्तुस्थिती आहे. ते आपले २४ तास बांधील नाही.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** स.सदस्य अर्ध्या तासा पासुन पाणी समस्यावर चर्चा करीत आहे. प्रत्येक प्रभागात पाण्याची समस्या आहे साफसफाईची समस्या आहेत आणि या समस्या कायम संपणार नाही. राज्यात सर्वत्र प्रत्येक वर्षी डिसेंबर ते जून या कालावधीत पाण्याची समस्या निर्माण होते. मराठवाडयातील इतर शहरपेक्षा नांदेडची परिस्थिती वेगळी आहे. नांदेड शहरात जवळपास ५५ ते ६० हजार नळ कनेक्शन आहेत त्यापैकी जवळपास ९० टक्के नागरीकांना मुबलक पाणी पुरवठा होतो. फक्त १० टक्के नागरीकांना पाण्याची समस्या असू शकते, एलबीटी बंद केल्यामूळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब असल्यामूळे एएमआरसीची देयक लवकर मिळत नसल्यामूळे कत्राटदार काम करीत नसेल परतू मधला मार्ग काढून स.सदस्यांनी ज्या सुचना केलेल्या आहेत त्याप्रमाणे पाणी पुरवठयाची प्राधान्याने कामे करण्यात यावीत.यावर्षी पावसाळा कमी झाल्यामूळे डॉ.शंकरराव चव्हाण विष्णुपुरी जलाशयात कमी पाण्याचा साठा आहे आणि दोन महिण्यानंतर पाण्याचा साठा कमी होणार आहे त्यामूळे यावर्षी जलाशयातील गाळ काढण्याचा चान्स आहे. गाळ काढला तर जलाशयातील पाण्याच्या साठयात वाढ होवून पुढील वर्षी पाणी कमी पडणार नाही. गाळ काढण्याच्या कालावधीत आसना नदीतील पाणी आपणास घेता येईल.गाळ काढण्यासाठी तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करुन यावर्षी गाळ काढण्याचा प्रयत्न करण्यात यावा. अशी सुचना आहे.

**शीला कदम** माझ्या प्रभागातील छत्रपतीनगर ते मोर चौका पर्यत पाईप लाईन टाकल्यामूळे पुर्ण रस्ता खराब झालेला असून त्याची दुरुस्ती त्वरीत करण्यात यावी. शहरातील शासकीय दवाखान्याचे स्थलातर विष्णुपुरीला केल्यामूळे शहरातील गोर गरीब नागरीकांना रात्री बे रात्री रुंग्णाना दवाखान्यात घेवून जाण्यास खुप अडचणीचे होत आहे त्याना वेळेवर औषधोपचार मिळत नाही. हैदरबाग येथे दवाखान्याकरीता इमारतीचे बाधकाम करण्यात आलेले असून त्या इमारतीत त्वरीत प्रसृतीगृह व बाहय रुग्णालय सुरु करण्यात यावे जेणे करुन गोर गरीब महिलाना प्रसुती गृहाची वैद्यकिय सुविधा मिळू शकेल. प्र.सहायक आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी यांना वाहन भत्ता मंजुर करण्यात आलेला असून त्यांचे वाहन भत्ता चे देयक प्रलंबित आहे .

**आयुक्त** हैदरबाग येथे बांधण्यात आलेल्या इमारतीत शासनातर्फे दवाखाना सुरु करण्यासाठी महासभेने मान्यता दिलेली आहे नुसार प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला असून सतत शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

श्री गुरु गोविंदसिंघजी रुग्णालय सुर करण्यासाठी शासनाने १५ कोटीचा निधी मंजुर केलेले असून लवकरच पुर्ववत दवाखाना सुरु होईल. शासनाच्या नॉर्म नुसार नांदेड शहराची लोकसंख्या ही ९.५० लक्षाच्या वर गेल्यानंतर शासनाकडून दुसरा दवाखाना मंजुर होईल. सहायक आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी यांना वाहन भत्ता मंजुर करण्याबाबत नगरसचिव खुलासा करतील.

**नगरसचिव** सहायक आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी यांना वाहन भत्ता मंजुर करण्यात आलेला असून त्यास लागणा-या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्याचा प्रस्ताव मा. आयुक्तांनाकडून प्राप्त झालेला आहे.

**सुंदरलाल गुरुखुदे** जून्या नांदेड शहरात अरुंद गल्ल्या असल्यामूळे पिण्याची पाईप लाईन व मलनिस्सारण लाईन जवळ जवळ टाकण्यात आलेल्या आहेत. या पाईप लाईन जुन्या झाल्यामूळे गळत्याचे प्रमाणही जास्त आहेत या गळत्यामूळे दुषित पाणी पाणी पुरवठा लाईन मध्ये जावून दुषित पाणी पुरवठा होत आहे.गळत्या त्वरीत दुरुस्त करण्यात याव्यात.

**आयुक्त** नांदेड शहराला पाणी पुरवठा करणा-या डॉ.शंकरराव चव्हाण विष्णुपुरी जलाशयात आजघडीला ३४.१५ द.ल.घ.मि.पाण्याचा साठा उपलब्ध्द आहे. डिसेंबर ,जानेवारी ,फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे, जून या सात महिण्याला शहराला जेवढा पाणी पुरवठा लागतो तेवढा साठा जलाशयात उपलब्द आहे. या सात महिण्याकरीता आपणास जवळपास १४ द.ल.घ.मि.पाण्याची आवश्यकता लागणार आहे. ३४.१५ द.ल.घ.मी. मधील पाण्याचे बाष्पीभवन , किंवा इतर मार्गाने पाणी कमी झाले तरी आपणास १४ द.ल.घ.मि.पाणी मिळणार आहे.त्यामूळे एवढी काळजी करण्यासारखी परिस्थिती नाही परिस्थिती नियंत्रणात आहे. दुस-या रु.१५ कोटीची पर्यायी पाणी पुरवठा योजनेस स.सदस्यांनी व त्या भागातील नागरीकांनी सहकार्य केल्यामूळे ही योजना पुर्णत्वास येत आहे. विद्युत कनेक्शन जोडणी मिळालेली असून ७-८ दिवसात विद्युत पंपाची

चाचणी घेण्यात येईल. आसना नदीवर बांधण्यात आलेल्या कोल्हापुरी बधा-यांची १.९५ द.ल.घ.मि.पाणी साठविण्याची क्षमता असून बंधा-यातील गाळ काढण्यात आलेला आहे. अप्पर पैनगंगा धरणातून कॅनॉलव्दारे सहा आर्वतन मिळणार आहे त्यातून ६ द.श.ल.घ.मिटर पाणी आपणास मिळू शकेल. विष्णुपरी जलाशयातून ८ द.ल.घ.मि.लागेल. शासनाने उन्हाळी तातडीची पाणी पुरवठा योजनेचा आराखडा सादर करण्यास कळविले तर प्रत्येक प्रभागात स. सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे विधन विहिरीचा आराखडा तयार करुन शासनास सादर करण्यात येईल. आज महानगरपालिकेच्या निधीतून विधंन विहिरी घ्यावयाचे झाल्यास जळपास रु.८ कोटी लागतील. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थती खराब असल्यामूळे मनपा निधीतून एवढा खर्च आपण करु शकत नाही. शासनाने मंजुर केलेल्या निधीतून विंधन विहिरी घेण्यात येतील.सध्या जमिनीतील पाण्याची पातळी वर आहे,उन्हाळयात पाण्याची पातळी खाली जाते त्यावेळी भु जल सर्व्हेक्षण यांच्या अहवालानूसार पाणी टंचाई भागात विधन विहिरी घेता येईल.अस्तित्वात असलेल्या विंधन विहिरी वरील हातपम्प ना दुरुस्त आहेत ते प्राधान्याने दुरुस्ती करण्यात येतील. पाईप लाईनच्या गळत्या दुरुस्ती, क्रॉस कनेक्शन देण्याच्या कामास प्राधान्य देवून कामे करण्यात येतील.सध्या पाण्याची एवढी गंभिर बाब नाही. लातूर, परभणी बीड या शहरासारखी आपली परिस्थिती नाही.सर्व स.सदस्यांनी व शहरातील नागरीकांनी प्रशासनास सहकार्य करावे. केद्र शासनाने बिएसयुपी योजने अंतर्गत इन्फ्रास्ट्रक्चरची कामे करण्यासाठी निधी देण्याचे बंद केलेल आहे .शासनाने १० कोटीचा निधी मंजुर केलेला असून त्यातून मुलभूत नागरी सुविधांची कामे करणे शक्य आहे. स.सदस्यांनी रस्त्याचे कामाना प्राधान्य न देता पाणी पुरवठा व मलनिस्सारणाचे कामास प्राधान्य द्यावे.मा.प्रधान सचिव ,नगरविकास यांनी गोपनयि पत्राव्दारे ज्या महानगरपालिकानी बिएसयुपी योजनेची चांगली कामे केली आहे अशा महानगरपालिकांना स्मार्ट हौसिग इनिशिएटिव्ह पुरस्काराचे वितरण मा.मुख्यमत्री किंवा राज्यपालांच्या हस्ते करण्यात येणार असून या बक्षिस वितरण कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी कळविलेले आहे. या पुरस्कारासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची निवड झाल्याचे समजते. परंतु आजच्या सर्वसाधारण सभेत स्थायी समिती सदस्य निवडीचा महत्वाचा विषय असल्यामूळे सभागृहाचा मान ठेवून मी स्वतः न जाता का.अभियंता श्री सुग्रीव अंधारे व श्री स्वामी क.अभियंता बिएसयुपी यांना पुरस्कार स्विकारण्यासाठी मुंबई येथे पाठविलेले आहे, तसेच श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त पाणी पुरवठा हे माझ्या मान्यतेने रजेवर आहे.

**अ.हबीब बागवान** — हैदरबाग देगलूर नाका भागात दवाखाना सुरु करण्यासाठी ४-५ वर्षापुर्वी इमारतीचे बाधकाम करण्यात आलेले असून इमारत ओस पडलेली आहे.या इमारतीत दवाखाना केंव्हा सुरु करण्यात येणार आहे याचा खुलासा करण्यात यावा.

**अ.सत्तार** — गुरु ता गध्दी कार्यकमा अंतर्गत हैदरबाग येथे दवाखान्याकरीता इमारत बांधण्यात आलेली असून अद्याप त्या ठिकाणी दवाखाना सुरु करण्यात आलेला नाही. दवाखाना सुरु करता येत नसेल तर त्याठिकाणी कोंडवाडा सुरु करण्यात यावा.

**आयुक्त** — सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयानुसार शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून प्रस्तावास मान्यता मिळविण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे .

**अ.सत्तार** — हैदरबाग येथे मुस्लीम वस्ती असल्यामूळे त्या भागात दवाखाना सुरु करणात येत नाही काय ,आयुक्तास विनंती आहे की, महानगरपालिकेतर्फे दवाखाना सुरु करता येत नसेल तर बीओटी तत्वावर चालविण्यासाठी देण्यात यावा जेणे करुन त्या भागातील नागरीकांना वैद्यकिय सुविधा मिळू शकेल.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** — शासन दवाखाना चालू करीत नसेल तर महानगरपालिकेतर्फे दवाखाना सुरु करण्यासाठीचा प्रस्ताव पुढील सभेत आणावा त्यावर सभागृह निर्णय घेईल.

**शफि अहेमद कुरेशी** — प्रत्येक सभेत हैदरबाग येथे बांधण्यात आलेल्या इमारतीत दवाखाना सुरु करण्याची मागणी होत आहे. परतु त्यावर पर्याय निधत नाही. हैदरबाग, देगलुर नाका भागात मोठया प्रमाणात अल्पसंख्याक गरीब लोकाची वस्ती आहे या भागात महानगरपालिकेतर्फे दवाखाना सुरु केला तर गरीब नागरीकांना वैद्यकिय सुविधा उपलब्ध्द होवू शकेल. महापौर व आयुक्तांना विनंती आहे की. लवकरात लवकर पर्याय शोधून व खर्चाची तरतूद करुन हैदरबाग येथे दवाखाना सुरु करावा.

**महापौर** — सर्व स.सदस्यांची भावना लक्षात घेता महानगरपालिकेतर्फे हैदरबाग येथे दवाखाना सुरु करण्याचा प्रस्ताव पुढील सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा.

**आयुक्त** — हैदरबाग येथील इमारतीत दवाखाना सुरु करण्याच्या संदर्भात सर्व बाबी तपासुन सविस्तर प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात येईल.

**स्नेहा पांढरे** महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग,शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण -2015/ प्र.क्र. 80/ नवि-16 तंत्रालय, मुंबई-32 दिनांक 17 नोव्हेंबर 2015 अन्वये  नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील महानगरपालिकाक्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत ``प्रभाग क्र. 5 मध्ये मुलभुत सुविधा विकास कामे करण्यासाठी `` महानगरपालिकेस रु.2.10 कोटी वितरीत करण्यात आला आहे. .(१७नोव्हेंबर २०१५ चा शासन निर्णय सभागृहात वाचुन दाखविणत आला) आयुक्त नांवामनपा नांदेड यांनी सदर शासन निर्णयानुसार ``प्रभाग क्र. 5 मध्ये मुलभुत सुविधा विकास कामे करण्यासाठी ``  रु.4.20 कोटीच्या प्रस्तावित कामाच्या प्रस्तावास  मा. जिल्हाधिकारी मार्फत जिल्हास्तरीय समितीकडे मान्यतेसाठी पाठविण्यास व शासन निर्णय नुसार महानगरपालिकेच्या 50 % हिश्याची रक्कम रु.2.10 कोटी महानगरपालिकेत निधी उपलब्धते नुसार वर्ग करुन प्राधाण्याने  कामे हाती घेण्यासाठी प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर केलेला आहे परंतु हा प्रस्ताव विषय पत्रिकेवर का घेण्यात आलेला नाही.याचा खुलासा करण्यात यावा. माझी सभागृहास विनंती आहे की विशेष बाब म्हणून  आयुक्त नांवामनपा यांनी ``प्रभाग क्र. 5 मध्ये मुलभुत सुविधा विकास कामे करण्यासाठी जो प्रस्ताव सादर केलेला आहे त्यास मान्यता द्यावी.

**प्रमोद खेडकर** प्रशासनासाचा प्रस्ताव आलेला असतांना महापौरांनी हा विषय विषयपत्रिकेवर का घेतलेला नाही याचा खुलासा करण्यात यावा. नगरसेवकांना प्रभागातील विकास कामांच्या संदर्भात  प्रस्ताव मांडण्याची  वेळ का येत आहे. नगरसेवक मरमर करुन शासनाकडून निधी आणतो आणि त्यांचा प्रस्ताव घेण्यात येत नाही. शहरात विकासाची कामे करावयाची आहे किंवा नाही याचा खुलासा करण्यात यावा. त्यांचा विषय का घेण्यात आलेला नाही.सभागृहास विनंती आहे की,स्नेहा पांढरे यांच्या प्रभागात विकास कामाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**दिपकसिंह रावत** शासनाने प्रभाग क्र. ५ मध्ये विविध विकासाची कामे करण्यासाठी विशेष बाब म्हणून २.१० कोटीचा निधी मंजुर केला त्याबध्दल मी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करतो. प्रभागात विकासाची कामे करण्यासाठी महानगरपालिकेकडे कोणताही सोर्स नाही, कोणताही विशेष निधी नाही त्यामूळे स. सदस्य प्रभागात विकासाची कामे करण्यासाठी आपआपल्या परिने शासनस्तरावर पाठपुरावा करुन निधी आणतात.परंतु त्यांचा प्रस्ताव मान्यतेसाठी सभागृहात ठेवण्यात  येत  नाही. सभागृहास माझी विनंती आहे की, प्रथम महापौर श्री सुधाकर पांढरे यांच्या कन्या स्नेहा पांढरे यांनी शासनाकडून विशेष निधी  प्राप्त करुन आणलेला आहे. या  प्राप्त  निधीतून त्यांच्या प्रभागातील विकासाची कामे करण्यासाठी जो प्रस्ताव मांडला आहे त्यास मान्यता देण्यात यावी.कारण प्रभाग क्र. ५ मधील दोन्ही  नगरसेवक हे काग्रेस पक्षाचेच आहे .

**विरेंद्रसिंध गाडीवाले** सौ.स्नेहा ताई  पांढरे यांनी शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीतून त्यांच्या प्रभागातील विकास कामासाठी मान्यता देण्याचा प्रस्ताव मांडला आहे. शासनाने प्रभाग क्र.५ मध्ये विकास कामाकरीता रु.२.१० कोटीचा निधी देवून तेवढाच सहभाग महानगरपालिकेने नोंदविण्यासाठी मान्यता दिलेली आहे त्याबध्दल महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करण्यास हरकत  नाही.कारण महाराष्ट राज्याचे मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस साहेबांनी प्रभाग क्र.५ मध्ये निवडून आलेले दोन्ही सदस्य हे कॉग्रेस पक्षाचे असतांनाही विशेष बाब म्हणून  त्यांचे प्रभागात विकासाची कामे करण्यासाठी २.१० कोटीचा निधी मंजुर केलेला आहे.तेवढाच निधी महानगरपालिकेने खर्च करावा असा निर्णय घेतलेला आहे. याच शासन निर्णयात नुसार महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकांना महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत निधी मंजुर केलेला आहे मात्र नांदेड महानगरपालिकाकरीता फक्त दोन्ही कॉग्रेस नगरसेवकांचे   प्रभाग क्र. 5 मध्ये  मुलभुत सुविधा विकास कामे करण्यासाठी रु.२.१० कोटीचा निधी दिलेला आहे हे विशेष  त्याबध्दल महाराष्ट्र राज्याचे मुख्यमत्री मा.ना.श्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करण्यात यावे.शिवसेना सदस्या सौ.वैशाली मिलिंद देशमूख, भाजपचे सदस्य श्री अभिषेक सौदे यांचेही प्रभागात विकासाची कामे करण्यासाठी विशेष बाब म्हणून निधी देण्यासाठीचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेले आहे त्यास शासनाने मान्यता दिलेली नाही. गुरु ता गददी कार्यक्रमा अंतर्गत ७-८ वर्षापुर्वी शहरातील सर्व मुख्य रस्त्याची कामे करण्यात आली असल्यामूळे त्या रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे परंतु निधी अभावी दुरुस्ती होत नाही. त्यामूळे शिवसेना व भारतीय जनता पार्टीच्या सदस्यांना विनंती आहे की स्थानिक आमदाराचे सहकार्य घेवून नांदेड शहरातील मुख्य रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी मुलभूत सुविधा विकास अंतर्गत विशेष बाब म्हणुन रु.५०.०० कोटीचा निधी तसेच श्री गुरुगोविंदसजी स्टेडियमचे दुरुस्ती करण्याचे काम हाती घेण्यात आलेले असून ते आंतरराष्ट्रीय दर्जाचे करण्यात आहे त्यासाठी मोठया प्रमाणात खर्च येत आहे त्याकरीताही निधी देण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री देवेंद्र फडणवीस यांना प्रस्ताव सादर करुन निधी मिळण्यासाठी प्रयत्न करावा.

**अभिषेक सौदे** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना.श्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रभाग क्र. 5 मध्ये मुलभुत सुविधा विकास कामे करण्यासाठी रु.२.१० कोटीचा निधी मंजुर केलेला आहे त्याबध्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. महाराष्ट्रात शिवसेना बीजेपीचे सरकार असून ते राज्यातील ११ कोटी नागरीकाचे सरकार आहे.केंद्रात भापचे सरकार असून आमचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांचा सबका साथ सबका विकासाचा नारा आहे.आमचा पक्ष जात पात धर्म पाळत नाही. सर्वाना बरोबर घेवून चालतो. माझ्या प्रभागात विकासाची कामे करण्यासाठी शासनास रु.१० कोटीचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे, तसेच शिवसेना पक्षाचे नगरसेविका सौ.वैशाली मिलिद देशमूख, नगरसेवक श्री सुदरलाल गुरुखूदे यांच्या प्रभागातही विकास कामे करण्यासाठी रु.१० कोटी निधी देण्याचा प्रस्ताव आहे. तो ही शासनाच्या विचाराधीन आहे. शिवसेना बीजेपीचे सदस्य शहर विकासाच्या कामात कुठेही कमी पडणार नाही .सौ.स्नेहाताई पांढरे यांनी त्याचे प्रभागात शासन निधीतून कामे करण्यासाठी जो प्रस्ताव मांडला आहे त्यास सभागृहाने मान्यता द्यावी.

**अशोक उमरेकर** गुरु ता गददीच्या कामात कॉग्रेस पक्षाचे सरकारने काय केलेले आहे याची आम्हाला क्ल्पणा आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी कोणताही भेदभाव न करता प्रभाग क्र.५ मधील दोन्ही नगरसेवक कॉग्रेस पक्षाचे असतांनाही त्यांचे प्रभागात विकासाची कामे करण्यासाठी रु.२.१० कोटीचा निधी मंजुर केलेला आहे त्याबध्दल मी मुख्यमंत्री व राज्य शासनाचे अभिनंदन करतो.

**दिपकिंसह रावत** मागील ३-४ सभेचे इतिवृत्त कायम करण्याचा विषय का ठेण्यात आलेला नाही. पुढील सभेत आम्हाला इतिवृत्त मिळाले पाहिजे. त्यामध्ये आयत्या वेळी ठराव घेण्यात आलेले असेल तर त्या ठरावाना आम्ही मान्यता देणार नाही. फक्त विषय पत्रिकेवरील विषयाना मान्यता देवू.

**स्नेहा पांढरे** प्रशासनाने प्रस्ताव दिलेला असतांनाही तो प्रस्ताव पुरवणी विषय पत्रिकेवर का घेण्यात आलेला नाही याचा खुलासा करण्यात यावा

**महापौर** सभेच्या दोन दिवसापुर्वी प्रस्ताव आलेला आहे प्रभागाचे दोन्ही स.सदस्याशी चर्चा करुन पुढच्या सभेत हा प्रस्ताव ठेवण्यात येईल.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** महानगरपालिका सभेचे कामकाज नियमानुसार सर्वसाधारण सभेत कोणते विषय ठेवावयाचे हे ठरविण्याचे अधिकार महापौरांना आहेत.मा.महापौरांनी प्रस्ताव नाकारलेला नाही पुढच्या सभेत ठेवण्यात येईल असे सांगितलेले आहे.. स्नेहाताई यांनी ते कॉग्रेस पक्षाच्या सदस्या आहेत की भाजपच्या सदस्या आहेत याचा खुलासा करावा. महाराष्ट्र शासनास प्रभाग क्र.५ मध्ये विकास कामाकरीता निधी मंजुर करण्यासाठी जी विनंती करण्यात आली ती भारतीय जनता पार्टीच्या लेटरपॅडवर करण्यात आलेली आहे. कॉग्रेस पक्षाचे नगरसेविका असतांना व कॉग्रेस पक्षाचे लेटरपॅड न वापरता भारतीय जनता पार्टीचे लेटरपॅड वापरुन व भाजपचे नगरसेविका असल्याचे दाखवून शासनाची दिशाभूल करुन शासनाकडून निधी मंजुर करुन आणलेला आहे. त्यांनी कॉग्रेस पक्षाचे लेटरपॅड न वापरता भारतीय जनता पार्टीचे लेटरपॅड कसे काय वापरले. महापौरांनी सौ.स्नेहाताई पांढरे यांच्या प्रस्तावावर पॉझिटीव्ह विचार करावा.

**दिपकसिंह रावत** सौ.स्नेहाताई पांढरे यांनी कॉग्रेस पक्षाचा राजीनामा दिलेला नाही त्या आजची कॉग्रेस पक्षाच्याच नगरसेविका आहेत त्यामूळे भेदभाव न करता त्यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**प्रमोद खेडकर** प्रस्ताव पुरवणी विषयपत्रिकेवर का घेण्यात आलेला नाही याचा खुलासा करण्यात यावा.

**दिपकसिंह रावत** विषय पत्रिकवर विषय क्र.१ वर लातूर फाटा ते वसंतराव नाईक कॉलेज सिडको पर्यत बीटी रस्ता करण्यासाठी रु.२.८३ कोटीचा प्रस्ताव आहे. अंदाजपत्रकात तरतूद नसतांना हा प्रस्ताव कसा काय विषय पत्रिकेवर घेण्यात आला हा प्रस्ताव जेव्हा येईल त्यावेळी स्नेहाताई पांढरे यांच्या प्रस्तावावरही एकत्रितपणे निर्णय घेण्यात यावा.

**संजय मोरे** विषय पत्रिकेवर विषय क्र.१ वर लातूर फाटा ते वसंतराव नाईक कॉलेज सिडको पर्यत बीटी रस्ता करण्यासाठी रु.२.८३ कोटीचा प्रस्ताव असून तो १० नगरसेवकांच्या प्रभागातील विकास कामाचा प्रस्ताव आहे.

**अशोक उमरेकर** प्रशासनाचा दलित वस्तीचा प्रस्ताव नसतांनाही व विषय पत्रिकेवरविषय नसतांनाही आयत्या वेळेस प्रस्ताव घुसडविण्यात आला होता, शासनाने निधी मंजुरी दिल्यानंतर प्रशासनाने प्रस्ताव दिल्यावरही तो पुरवणी विषय पत्रिकेवर धेण्यात आलेला नाही. स्नेहताईच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** सर्व स.सदस्यांच्या मान्यतेने दलित वस्ती सुधार योजनेच्या कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता दिलेली आहे.

**दिपकसिंह रावत** पुरवणी विषय क्र. १ च्या बरोबर स्नेहाताईचे प्रस्तावर निर्णय घेण्यात यावा.

**महापौर** शासनाने प्रभाग क्र. 5 मध्ये मुलभुत सुविधा विकास कामे करण्यासाठी रु.२.१० कोटीचा निधी मंजुर केलेला असून तेवढाच निधी म्हणजे रु.२.१० कोटी निधी महानगरपालिकेने द्यावयाचा आहे.महानगरपालिकेची आर्थिक परिस्थती पाहता चालू वर्षाच्या अंदाजपत्रकातून एकाच प्रभागात २.१० कोटीचा निधी कसा देता येईल. यावर विचार करुन पुढील सभेत निर्णयासाठी प्रस्ताव ठेवण्यात येईल.

**विषय क्र.१**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील मुला मुंलीचे गुणोत्तर-२०१५ प्रमाणाची नोंद घेणे बाबत.

| अ.क्र. | महिणा | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणौत्तर प्रति हजार मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १ | जानेवारी | १३११ | ११८८ | २४११ | ९०६.१७ |
| २ | फेब्रूवारी | १००४ | ९४१ | १९४५ | ९३७.२५ |
| ३ | मार्च | १०३३ | ९७७ | २०१० | ९४५.७८ |
| ४ | एप्रिल | १४७२ | १३२२ | २७९४ | ८९८.०९ |
| ५ | मे | ९८३ | ९१५ | १८९८ | ९३०.८२ |
| ६ | जून | १२२० | ११४९ | २३६९ | ९४१.८० |
| ७ | जूलै | ११२३ | ९४७ | २०७० | ८४३.२७ |
| ८ | ऑगस्ट | ११६१ | १११० | २२७१ | ९५६.०७ |
| ९ | सप्टेंबर | १७०३ | १५४३ | ३२४६ | ९०६.०४ |
| १० | ऑक्टोबर | १५६८ | १४१८ | २९८६ | ९०४.३३ |
| | नोव्हेंबर | १४१५ | १२०१ | २६१६ | ८४८.७६<br>२९.११.२०१५ पर्यत |
| | एकूण | १२५७८ | ११५१० | २४०८८ | ९१५.०८ |

**विरेंद्रसिध गाडीवाल** याच कालावधीत मागील वर्षी मुला मुंलीचे गुणोत्तर प्रमाणे काय होते त्याची माहिती दिली तर मुलीची वाढ झाली किंवा कसे ते समजु शकेल. मागीलवर्षीचा तुलनात्मक तक्ता देत जावा.

**आयुक्त** याच कालावधीतील मागील वर्षाचे मुला मुलीचे गुणोत्तराची माहिती देण्यासंबंधी केलेल्या सुचनेची मुख्य वैद्यकिय अधिका-यांनी दखल घेवून सभेत तशी माहिती देत जावी.

**महापौर** नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र. ८३** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील खालील प्रमाणे मुला मुंलीचे गुणोत्तर-२०१५ प्रमाणाची नोंद ही नांवामनपा सर्वसाधारणसभा सर्वानुमते धेते. घेणे बाबत.

| अ.क्र. | महिना | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणौत्तर प्रति हजार मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १ | जानेवारी | १३११ | ११८८ | २४११ | ९०६.१७ |
| २ | फेब्रूवारी | १००४ | ९४१ | १९४५ | ९३७.२५ |
| ३ | मार्च | १०३३ | ९७७ | २०१० | ९४५.७८ |
| ४ | एप्रिल | १४७२ | १३२२ | २७९४ | ८९८.०९ |
| ५ | मे | ९८३ | ९१५ | १८९८ | ९३०.८२ |
| ६ | जून | १२२० | ११४९ | २३६९ | ९४१.८० |
| ७ | जूलै | ११२३ | ९४७ | २०७० | ८४३.२७ |
| ८ | ऑगस्ट | ११६१ | १११० | २२७१ | ९५६.०७ |
| ९ | सप्टेंबर | १७०३ | १५४३ | ३२४६ | ९०६.०४ |
| १० | ऑक्टोबर | १५६८ | १४१८ | २९८६ | ९०४.३३ |
| | नोव्हेंबर | १४१५ | १२०१ | २६१६ | ८४८.७६<br>२९.११.२०१५ पर्यत |
| | एकूण | १२५७८ | ११५१० | २४०८८ | ९१५.०८ |

**विषय क्र.२**

शासन निर्णयानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाबत संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक महिन्यातील सर्वसाधारण सभेच्या विषय सूचीवर कायमस्वरुपी समावेश करुन या विषयाचा सविस्तर आढावा सभेमध्ये घेण्यात यावा असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात येते सदरचा विषयक कायमस्वरुपी सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेवर घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

आजपर्यंत केलेली कार्यवाही-

- एकुण 4202 पात्र /अपात्र लाभार्थ्यांची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तसेच क्षेत्रिय कार्यालयात डकविण्यात आलेली आहे.

| झोन क्र. | घरांची संख्या | वैयक्तीक शौचालय आहे | वैयक्तीक शौचालय नाही |
|---|---|---|---|
| अ | 14041 | 13069 | 957 |
| ब | 30292 | 28464 | 974 |
| क | 34400 | 33145 | 1151 |
| ड | 14304 | 13173 | 1120 |
| एकुण | 93037 | 87851 | 4202 |
| एकुण केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड अर्ज | तपासलेले अर्ज | मान्यता दिलेले अर्ज | नामंजुर केलेले अर्ज |
| 3546 | | 792 | 152 |

- नांदेड वाघाळा शहर हागंणदरीमुक्त करण्यासाठी 2 ऑक्टोंबर, 2017 ही तारीख अंतीम केलेली असुन त्याप्रमाणे नियोजन करण्यात येत आहे. मार्च 2016 अखेर 1700 वैयक्तीक शौचालयाचे बांधकामाचे उद्दिष्ठ ठरविण्यात आलेले आहे.
- घनकचरा व्यवस्थापनासाठी नियोजन चालु आहे. स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत मार्गदर्शक सुचनेनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी निविदा मागविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

**महापौर** शासन निर्णयानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) संदर्भात केलेल्या कार्यवाहीची नोंद धेण्यात येते.

**ठराव क्र.८४** **ठराव**

शासन निर्णयानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणी संदर्भात खालील प्रमाणे केलेल्या कार्यवाहीची नोंद ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

आजपर्यंत केलेली कार्यवाही-

- एकुण 4202 पात्र /अपात्र लाभार्थ्यांची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तसेच क्षेत्रिय कार्यालयात डकविण्यात आलेली आहे.

| झोन क्र. | घरांची संख्या | वैयक्तीक शौचालय आहे | वैयक्तीक शौचालय नाही |
|---|---|---|---|
| अ | 14041 | 13069 | 957 |
| ब | 30292 | 28464 | 974 |
| क | 34400 | 33145 | 1151 |
| ड | 14304 | 13173 | 1120 |
| एकुण | 93037 | 87851 | 4202 |
| एकुण केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड अर्ज | तपासलेले अर्ज | मान्यता दिलेले अर्ज | नामंजुर केलेले अर्ज |
| 3546 | | 792 | 152 |

- नांदेड वाघाळा शहर हागंणदरीमुक्त करण्यासाठी 2 ऑक्टोंबर, 2017 ही तारीख अंतीम केलेली असुन त्याप्रमाणे नियोजन करण्यात येत आहे. मार्च 2016 अखेर 1700 वैयक्तीक शौचालयाचे बांधकामाचे उद्दिष्ठ ठरविण्यात आलेले आहे.
- घनकचरा व्यवस्थापनासाठी नियोजन चालु आहे. स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत मार्गदर्शक सुचनेनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी निविदा मागविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

**विषय क्र.३**

शासन निर्णय क्रं –अग्रीम -२०१५ /प्र क्र५७/१५/विनियम तारीख २६ ऑक्टोंबर २०१५ च्या शासण निर्णय नूसार दि १ जानेवारी २००६ पासून सुधारीत करण्यात आलेल्या वेतन संरचनेतील ज्या अराजपत्रीय राज्य शासकीय कर्मचा-यांना ग्रेडवेतन ४८०० पेक्षा अधिक नाही अशा अराजपत्रीय कर्मचा-यांना रू १००००/- सण अग्रीम अनुज्ञेय केलेली आहे त्यानुसार कार्यालयीन आदेश क्र.नावाशमनपा/लेवि/९७२३/२०१५ दि.२८ऑक्टोंबर २०१५ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचा-यांनाही १ दिवाळी २ रमझान इद ३ख्रिसमस ४ पारसी नववर्ष ५ संवत्सरी ६ रोश-होश्सना ७र्वाशाखी पोर्णिमा(भगवान बुध्द जयंती ) ८ स्वातंत्र दिन ९ प्रजासत्ताक दिनास यापुढे सण अग्रीम रक्क्म रूपये १०,०००/- देण्याची रक्कम अदा करण्यासाठी २३५ कर्मचा-यांना प्रत्येकी अग्रीम रक्क्म रूपये १०,०००/- याप्रमाणे लागणा-या खर्चास आदेश क्र .नावाशमनपा/लेवि/९७२४/२०१५ दि.२८.१०.२०१५ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**महापौर** कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.८५** **ठराव**

शासन निर्णय क्रं –अग्रीम -२०१५ /प्र क्र५७/१५/विनियम तारीख २६ ऑक्टोंबर २०१५ च्या शासण निर्णय नूसार दि १ जानेवारी २००६ पासून सुधारीत करण्यात आलेल्या वेतन संरचनेतील ज्या अराजपत्रीय राज्य शासकीय कर्मचा-यांना ग्रेडवेतन ४८०० पेक्षा अधिक नाही अशा अराजपत्रीय कर्मचा-यांना रू १००००/- सण अग्रीम अनुज्ञेय केलेली आहे त्यानुसार कार्यालयीन आदेश क्र.नावाशमनपा/लेवि/९७२३/२०१५ दि.२८ऑक्टोंबर २०१५ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचा-यांनाही १ दिवाळी २ रमझान इद ३ख्रिसमस ४ पारसी नववर्ष ५ संवत्सरी ६ रोश-होश्सना ७र्वाशाखी पोर्णिमा(भगवान बुध्द जयंती ) ८ स्वातंत्र दिन ९ प्रजासत्ताक दिनास यापुढे सण अग्रीम रक्क्म रूपये १०,०००/- देण्याची रक्कम अदा करण्यासाठी २३५ कर्मचा-यांना प्रत्येकी अग्रीम रक्क्म रूपये १०,०००/- याप्रमाणे लागणा-या खर्चास आदेश क्र .नावाशमनपा/लेवि/९७२४/२०१५ दि.२८.१०.२०१५ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसधारण सभा सर्वानुमते देते.

**विषय क्र.४**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(३) नुसार स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या आठ (८) सदस्यांच्या जागेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(५) व ३१-(अ) नुसार पालिका सदस्यातून स्थायी समितीवर ८ सदस्यांची नियुक्ती करणे बाबत.

(सभागृह नेते श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले व ए.आय.एम.आय.एम-संविधान पार्टीचे गटनेते यांनी सदस्यांच्या नावाचे सिलबंद पाकिटे मा.महापौर यांच्या सादर केले व त्यांनंतर महापौरांनी ते सभागृहास सिलबंद असल्याचे दाखवून सिलंबद पाकीटे उघडली.)

**महापौर** स्थायी समितीवर रिक्त झालेल्या 8 सदस्याचे जागेवर नविन 8 सदस्यांची नेमणूक करण्यासाठी संख्याबळानुसार ए.आय.एम.आय.एम-संविधान पार्टी आघाडीचे गटनेते श्री स.शेर अली महमंद अली यांनी १) फारुख हुसेन कासिमसाब, २) जकिया बेगम स.मुखतार या दोन सदस्यांची नावे सुचविली असून सभागृह नेते श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी १).शर्मा पुष्पाताई राजेश २) इतरत फातेमा अ.शमीम ३) कोकुलवार लक्ष्मीबाई तुळशीराम ४).कदम गंगाबाई नारायण ५) चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह ६).तेहरा अनुजा अमितसिंह या सहा सदस्याची नांवे सुचविली आहे आहे. आलेल्या नांवावर कोणाचा काही आक्षेप आहे काय

**महापौर** कोणाचाही आक्षेप आलेला नसल्यामूळे १) फारुख हुसेन कासिमसाब, २) जकिया बेगम स.मुखतार ३).शर्मा पुष्पाताई राजेश ४) इतरत फातेमा अ.शमीम ५) कोकुलवार लक्ष्मीबाई तुळशीराम ६).कदम गंगाबाई नारायण ७) चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह ८).तेहरा अनुजा अमितसिंह यांची संख्याबळानूसार नामनिर्देशानाव्दारे स्थायी समितीवर सदस्यपदी निवड झाल्याचे जाहिर करण्यात येते.

**ठराव क्र.८६** **ठराव**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम २०)३ (व सुधारीत कलम 31(अ) मधील तरतूदीनूसार नादेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील मान्यता प्राप्त पक्षाचे /नोंदणीकृत पक्षाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून सभागृह नेता, व ए.आर.एम.आय.एम-संविधान पार्टी आघाडीचे गट नेते यांनी दि.१.१२.२०१५ रोजी रोजी दुपार नंतर निवृत्त होणा-या स्थायी समितीचे (8) सदस्यांच्या जागेवर नविन (8) पालिका सदस्यांची नेमणूक करण्यासाठी सुचविलेल्या नावाप्रमाणे स्थायी समितीवर खालील (8) पालिका सदस्यांची नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते . व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

१) शर्मा पुष्पाताई राजेश, (भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस अपक्ष आघाडी)

२) इशरत फातेमा अ.शमीम, (भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस अपक्ष आघाडी)

३) कोकुलवार लक्ष्मीबाई तुळशीराम, (भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस अपक्ष आघाडी)

४) कदम गंगाबाई नारायण, (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस अपक्ष आघाडी)

५) चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह,(भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस अपक्ष आघाडी)

६) तेहरा अनुजा अमितिंसह (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस अपक्ष आघाडी)

७) फारुख हुसेनसाब कासिमसाब, (ए.आर.एम.आय.एम-संविधान पार्टी आघाडी)

८) जकिया बेगम स. मुखतार, (ए.आर.एम.आय.एम-संविधान पार्टी आघाडी)

**विषय क्र.५**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हध्दीत माता गुजरीजी विसावा उद्यानासोबत लहान मोठे चौदा उद्याने अस्तीत्वात आहे.सदरील उद्यानामध्ये मुलांच्या विरंगुळयासाठी विविध खेळणी साहित्य,मेरीगो राऊंड व ट्रेन लावलेले आहेत. विरंगुळयाच्या साहित्यासोबत उद्यानामध्ये विस्तीर्ण लॉन, वृक्षवल्ली ,अंतर्गत रस्ते,दिवाबत्ती ,पाण्याची सोय आहे.

उद्यानाच्या देखभाल दुरुस्ती व दैनंदिन रखवालीसाठी सध्या मनपाचे जळपास ९० कर्मचारी कार्यरत आहेत. सदरील मनुष्यबळाचा मासिक वेतनावर होणारा खर्च तसेच उद्यानापासून मिळणारे उत्पन्न याचा ताळमेळ पाहता मोठया प्रमाणामध्ये तुट दिसून येते. उत्पन्न कम व होणारा खर्च जास्तीचा आहे. सदरील कामे पार पाडण्याकरीता कर्मचा-यांची कमतरता भासत असून उद्यानांच्या देखभाल व दुरुस्तीवर इतर कामामूळे परिणाम होवून उद्यानाचा दर्जा खालावला आहे.

उपरोक्त बाबी लक्षात घेता पाहता उद्यानांचा दर्जा उत्तम राहणे व शहरातील उद्यान विभागाशी निगडीत कामे व्यवस्थित पार पाडण्याकरीता विविध उद्यांनाचा Public private partnership चा पर्याय अवलंबविल्यास कर्मचा-यांच्या पगारावरचा बोजा कमी होवून इतर कामासाठी कर्मचारी उपलब्ध्द होतील. व नागरीकांना उद्यानामध्ये चांगल्या प्रकारच्या सुविधा देणे शक्य होईल.

वरील सर्व बाबीचा विचार करता माता गुजरीजी विसावा उद्यानासोबत नांदेड शहरातील महत्वाचे उद्यानाचे Public private partnership केल्यास नागरीकांना उत्त्म प्रकारची सेवामिळेल व उद्यान विभागाचे कर्मचारी इतर कामाकरीता उपलब्द होतील. नांदेड शहरातील महत्वाचे खालील प्रमाणे सात उद्याने Public private partnership धर्तीवर चालविण्यास देता येणे शक्य आहे.

१) माता गुजरीजी विसावा उद्यान – झोन ब
२) नाना नानी पार्क – झोन ब
३) वेणू गोपाल बियाणी उद्यान ,जुनामोंढा टॉवर - झोन क
४) किल्ला उद्यानप - झोन क
५) चौफाळा उद्यान – झोन क
६) सिडको मध्यवर्ती उद्यान – ड
७) गोदावरी गृहनिर्माण सोसायटी उद्यान – झोन ड

उपरोक्त सर्व बाबीचा विचार करता इतर महानगरपालिकेच्या धर्तीवर Public private partnership अंतर्गत वरील उद्याने चालवण्यास देण्याबाबत सर्वसाधारण सभे समोर प्रस्ताव सादर

**बालाजी कल्याणकर** महानगरपालिकेचे उद्यान Public private partnership तत्वावर देण्यासाठी प्रस्ताव सभागृहासमोर सादर करण्यात आलेला आहे परंतु प्रस्तावात उद्यान प्रवेशासाठी नागरीकांकडून किती शुल्क घेण्यात येईल याचा उल्लेख नाही त्यामूळे त्याचे शुल्क निश्चित करुनच पीपीपी तत्वावर उद्याने देण्यात यावीत.

**विरेंद्रसिंध गाडीवाले** उद्यानांच्या देखभाल व दुरुस्तीवर इतर कामामूळे परिणाम होवून उद्यानाचा दर्जा खालावला असून आपण नागरीकाना चांगली सुविधा देवू शकत नाही म्हणून पीपीपी तत्वावर उद्यान चालविण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्याचे व शहराचे सुशोभिकरण (ग्रीनसिटी) करण्याचे काम महानगरपालिका करु शकत नाही म्हणून मागील ७-८ वर्षापासुन गुरुव्दारा लंगर साहिब मार्फत शहरातील व शहरात येणा-या रस्त्याच्या दोन्ही बाजूने व मोकळया जागेत मोठया प्रमाणात वृक्षारोपन काम हाती घेतलेले आहे. गुरुव्दारा लंगर साहिब मार्फत लावण्यत आलेल्या झाडापैकी ९० टक्के झाडाचे जतन झालेले आहे.या कामासाठी ते दरवर्षी लाखो रुपये खर्च करीत आहे. आजपर्यंत देशात राज्यात वृक्षारोपनाचे कार्य करणारी एकही संस्था पुढे आलेली नाही. म्हणून गुरुव्दारा लंगर साहिबला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना महानगरपालिकेने आवश्यक ती मदत करावी जसे पाण्याचे टॅन्कर, झांडाचे जतन व सगोपन सरंक्षण करण्यासाठी पाणी देण्यासाठी लागणारा मजुर वर्ग, ट्रिगार्ड देण्यात यावी अशा प्रकारचा ठराव महानगरपालिकेने केलेला आहे परंतु त्या ठरावाची अमलबजावणी अद्याप झालेली नाही. आयुक्तांना विनंती आहे की. महानगरपालिकेने घेतलेल्या निर्णयाचा फेर विचार करावा. कायद्यातील चौकटीत बसुन त्यांना मदत करण्यात यावी. उद्यान Public private partnership वर देण्यासाठी सर्व नियम व अटी तयार करुन त्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

**आयुक्त** महानगरपालिकेचे उद्यान Public private partnership तत्वावर देण्यासाठीचा धोरणात्मक निर्णय घ्यावा. प्रशासना मार्फत नियमानुसार अटी व शर्तीस सभेची मान्यता घेवूनच पुढील कार्यवाही कण्यात येईल

**आनंद चव्हाण** गुरुव्दारा लंगर साहिब मार्फत नांदेड शहर ग्रीनसिटी करण्यात येत आहे त्याना महानगरपालिकेने मदत करावी.

**रामनारायणजी काबरा** मागील पाच सहा वर्षा पासुन नांदेडला ग्रीनसिटी करण्याचे एवढे मोठे चांगले काम बाबाजींच्या हस्ते होत असल्यामूळे त्यांचा महानगरपालिकेतर्फे भव्य सत्कार करण्यात यावा.ग्रीनसिटीकरीता महागनरपालिकेकडून जी मदत करणे शक्य होइल ती देण्यात यावी.

**सविता कंठेवाड** नांदेड ग्रीनसिटीचे चांगले कार्य बाबाजींच्या हस्ते होत असल्यामूळे सिटजेष्ठ सदस्य श्री रामनाराणजी काबरा यांनी बाबाजीचा सत्कार करण्याचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. त्यांचा महानगरपालिकेतर्फे भव्य सत्कार करण्यात यावा.

**दिपकसिंह रावत** बाबाजींचा फक्त सत्कार करुन चालणार नाही. ग्रीनसिटी करीता त्यांना जी काही मदत देता येईल ती देण्यात यावी. ट्रिगार्ड देण्याचा विचार करण्यात यावा.

**महापौर** बाबाजींचा सत्कार करण्याचा संदर्भात पदाधिकारी व जेष्ठ सदस्यांशी विचार विनिमय करण्यात येइल. महानगरपालिकेचे सात उद्याने Public private partnership वर चालविण्यास देण्याकरीता त्यांच्या नियम व अटी तयार करुन नियम व व अटी सह प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात यावा. त्यानंतर सदर प्रस्तावावर निर्णय घेण्यात येईल.

**ठराव क्र.८७** **ठराव**

नांदेड शहरातील महत्वाचे सात उद्याने Public private partnership धर्तीवर चालविण्यास देण्याकरीता त्याच्या नियम व अटी तयार करुन त्या नियम व अटीसह सदरचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात यावा असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**विषय क्र.६**

नांवामनपा सर्वसाधारण सभेने ठराव क्र.२४५ दि.३१.३.२०१५ अन्वये मनपा हद्यीत विविध भागात रिलायन्स 4G या अंतर्गत भूमिगत केबल लाईन टाकण्याचे काम त्वरीत थांबविण्यात यावे तसेच सदर कंपनीचे मोबाईल टॉवर उभे करण्याचे अथवा त्यास केबल जोडणीचे काम चालू असल्यास ते देखील तात्काळ थांबविण्यात यावे. तसेच सदरील झालेले काम व पुढे काम सुरु करण्याच्या निर्णय घेण्यासाठी तत्कालिन उपमहापौर श्री आनंद चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली श्री उमेश चव्हाण, श्री स.शेर अली,सौ.सुदर्शना महेश खोमणे, श्री प्रमोद खेडकर, श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियता यांची एक उपसमिती कायम केली होती, (या उप समितीचे स. सदस्य श्री श्री प्रमोद खेडकर, व

श्री स.शेर अली यांनी दि.९.१०.२०१५ रोजी राजीनामा दिलेला आहे. ) या उपसमितीने दि.३१.१०.२०१५ रोजी मा.महापौर नांवामनपा नांदेड यांच्याकडे खालील प्रमाणे आपला अहवाल सादर केलेला आहे त्यावर विचार करणे बाबत.

<u>**मनपा हध्दीत विविध भागात रिलायन्स ४ जी या अंतर्गत भूमिगत केबल लाईन टाकण्याचे कामाची तसेच शहरात उभारण्यात आलेल्या मोबाईल टॉवरची चौकशी करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या उपसमितीचा अहवाल**</u>

नांवामनपा सर्वसाधारण सभेने ठराव क्र.२४५ दि.३१.३.२०१५ अन्वये मनपा हद्यीत विविध भागात रिलायन्स 4G या अंतर्गत भूमिगत केबल लाईन टाकण्याचे काम त्वरीत थांबविण्यात यावे तसेच सदर कंपनीचे मोबाईल टॉवर उभे करण्याचे अथवा त्यास केबल जोडणीचे काम चालू असल्यास ते देखील तात्काळ थांबविण्यात यावे. तसेच सदरील झालेले काम व पुढे काम सुरु करण्याच्या निर्णय घेण्यासाठी उपमहापौर श्री आनंद चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली श्री उमेश चव्हाण, श्री स.शेर अली,सौ.सुदर्शना महेश खोमणे, प्रमोद खेडकर, श्री गिरीष कदम,कार्यकारी अभियता यांची एक उपसमिती कायम करण्यास मान्यता देवून समितीचा मंजुरी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय मनपा प्रशाससनाने सदरील काम सुरु करण्यात येवू नये असा ठराव संमत केला होता.

सदर ठरावान्वये प्राप्त झालेल्या अधिकारान्वये उपरोक्त समितीचे अध्यक्ष श्री आनंद चव्हाण यांच्यास अध्यक्षतेखाली व उपसमितीचे सर्व सदस्य यांच्या उपस्थितीत दि.१३.४.२०१५ व दि.१४.७.२०१५ रोजी बैठक घेवून या बैठकीत सदस्यांनी काही सुचना व माहिती मागविलेली होती. या अनुषंगाने सविस्तर चर्चा विनिमय होवून सदर प्रकरणाची सविस्तर चौकशी करुन उपसमिती खालील प्रमाणे निष्कार्षावर आली.त्यासबंधीचा चौकशी अहवाल.

१) मा.आयुक्तांना बाधकाम उपविधी मधील नियम ३२ (१) (इ) चा वापर फक्त महानगरपालिका बिल्डींग बॉयलॉज अंतर्गत मनपा हदीतील बिल्डींग परवानगीसाठीच वापरण्याचे अधिकार आहेत. मोबाईल टॉवरर्स उभारण्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार महाराष्ट शासनाने दि.४ मार्च २०१४ रोजी एक वेगळी उपविधी केली आहे. त्या उपविधीचा वापर न करता मा.आयुक्तानी बांधकाम उपविधीमधील नियमा अंतर्गत नियम ३२ (१) (इ) चा वापर करुन त्यांच्या विशेष अधिकारात रिलायन्स कंपनीच्या २६ मोबाइल टॉवर ला परवानगी दिलेली आहे. मोबाइल टॉवर उभारण्यासाठी एनओसी देण्याकरीता महाराष्ट्र शासनाने ४ मार्च २०१४ चे जे राजपत्र काढलेले आहे त्यामध्ये २१ प्रकारच्या अटी व शर्ती टाकण्यात आलेल्या आहेत.त्याची पूर्तता न करता उदा.इमारत १५ मिटरपेक्षा उंच असणे ,रोड विडथ ,फायर एनओसी ,बांधकाम पुर्णत्वाचा दाखला इमारतीचे स्ट्रक्चरला ऑडीट तपासण्यात आले

नाही,विकास खर्च वसुल करण्यात आलेला नाही. ही बाब मोबाइल टॉवर उभारण्याकरीता एनओसी देण्यात आलेल्या आहेत.जे की बेकायदेशिर व महानगरपालिकेच्या हिताच्या विरुध्द आहे त्यामूळे देण्यात आलेल्या परवानग्या रध्द करण्यात याव्यात.

२) बांधकाम उपविधीमधील नियमा अंतर्गत नियम ३२ (१) (इ) चे वापर करुन प्रस्ताव धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेच्या महासभेपुढे आणणे आवश्यक असतांना तसा प्रस्ताव महासभेकडे आणण्यात आलेला नाही.

३) मोबाईल टॉवर ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे जरुरीचे होते तर शासनाने केलेली टॉवरर्स उभारणीचे दि.४.३.२०१५ च्या उपविधीनुसार काही शंका असल्यास त्याचे निरसण करण्यास नियम १० नुसार शासनाचे मार्गदर्शन घेतलेले नाही.

४) जर मोबाईल टॉवर विना परवानगीने उभारण्यात आलेले असतीलन तर पुणे व इतर महानगरपालिकेने तडजोड शुल्क आकारुन दंड लावून परवानगी अधिकृत केली त्याप्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत अमलबजावणी झालेली नाही. यामूळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

५) ४ जी अंतर्गत रिलायन्स कंपनीला रोड खोदण्याची परवानगी देण्यात आली व त्याचे रिस्टोरेशन चार्जेस हे कमी असून तेच दर जर पुणे व इतर महागनरपालिकेच्या धर्तीवर वसुल केले असते तर नादेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले असते.

६) ४ जी अंतर्गत रिलायन्स कंपनीला परवानगी दिलेल्या मंजुर नकाशापेक्षा जास्त खोदकाम झालेले आहे. जास्तीचे झालेले खोदकामावर दंड लावून ते सबंधित कंपनीकडून वसुल करावयास पाहिजे होते ते करण्यात आलेले नाही. तसेच महानगरपालिकेचया मलनिस्सारण व पाणी पुरवठा विभागाचा अहवाल देखील घेण्यात आलेला नाही.

७) महानगरपालिकेच्या जमिनीचे भू भाडे व रोड रिस्टोरेशन चार्जेस,मोबाईल टॉवरचे दर ठरविण्याचा अधिकार महानगरपालिकेच्या स्थायी समिती अथवा सर्वसाधारण सभेस असतांना तसे न करता मा.आयुक्त यांनी स्वत:च्या अधिकारात भू भाडे ठरविले त्यामूळे इतर महानगरपालिकेच्या तुलनेने ते भू भाडे नांदेड वाघाळा शहर महागनरपालिकेने कमी दराने घेण्यात आले असल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.व तसेच रिलायन्स ४ जी कंपनीशी करार करतांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३ (क) (ड) अंतर्गत येणा-या तरतूदीची पण पायमल्ली करुन करारनामा करण्यात आलेला आहे.

८) मा.महापौर व मा.आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांना दि.१.७.२०१५ रोजी रिलायन्स ४ जी अंतर्गत केंबल टाकण्याचे व मोबाईल टॉवर उभारण्याचे काम चालू आहे. ते त्वरीत थांबविण्या बाबतचे व संबंधित कामामध्ये अनियममितता झाल्यामूळे त्यांची चौकशी करण्यासाठी उपसमितीच्या सदस्यांनी पत्र दिले होते.

९) दि.३१.३.२०१५ रोजी सर्वसाधारण सभेत ठराव पारीत झाल्यावर सुध्दा सर्वसधारण सभेच्या निर्णयाची दखल न धेता व उपसमिती गठित असतांना देखील रिलायन्स कंपनीला केबल टाकण्यासाठी दि.२७.४.२०१५ ला रस्ता खोदकामाची परवानगी देण्यता आली तसेच दि.११.५.२०१५ रोजी (२७) मोबाईल टॉवरला ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे त्यामूळे मा.आयुक्त यांनी घेतलेल्या निर्णयाशी गठित करण्यात आलेल्या उपसमितीचे अध्यक्ष व उपसमितीचे सदस्य यांच्यात मतभिन्नता आहे.

तरी रिलायन्स कंपनीला मोबाईल टॉवर उभारण्यासाठी व रिलायन्स ४ जी चे भूमी अंतर्गत केंबल टाकण्यासाठी जे ना हरकत प्रमाणपत्र व समती देण्यात आलेली आहे ते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदीनूसार व शासन राजपत्रातील अटी व शर्ती प्रमाणे देण्यात आलेल्या आहेत किंवा नाही याची डायरेक्ट ऑफ टावून प्लॅनिग पुणे व मा.प्रधान सचिव,नगरविकास मंत्रालय महाराष्ट्र राज्य यांचे मार्फत् सविस्तर चौकशी करण्यासाठी ही गठित केलेली उपसमिती एकमताने महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस शिफास करते.

| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
|---|---|---|
| **आनंद चव्हाण** | **उमेश अशोकसिंह चव्हाण** | **एस.एम.खोमणे** |

**सुदर्शना खोमणे** बांधकाम उपविधी नियम ३२ (१) (इ) चा वापर कशा करीता करण्यात येतो. मोबाईल टॉवर उभारण्यासाठी शासनाने दि.४.३.२०१४ रोजी जे जीआर काढले त्यातील नियम १० नुसार काही शंका असल्याचे त्याचे निरसन करण्यासाठी मार्गदर्शन मागवावयास पाहिजे होते ते आयुक्त साहेबांनी का मागीतले नाही. बांधकाम उपविधीमधील नियमा अंतर्गत नियम ३२ (१) (इ) चा वापर करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे आणणे आवश्यक असतांना तसा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे का आणण्यात आलेला नाही. मोबाईल टॉवर उभारण्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार शासनाने ४ मार्च २०१४ एक वेगळी उपविधी केलेली असून त्या उपविधीचे उल्लंघन करण्यात आलेले आहे. उपविधीनूसार वेगवेगळया विभागाचे एनओसी घेण्यात आलेले नाही.

**आयुक्त** सभागृहास मी सांगू इच्छितो की, मा.महापौरांनी उपसमिती स्थापन केली, महापौरांकडे समितीचा अहवाल आला. नगरसचिवांनी मा.महापौरांचे वतीने हा अहवाल सभागृहात मांडलेला असल्यामूळे या प्रस्तावास आयुक्तांचे प्रशासनाचे

अनुमोदन नाही. आयुकत, किंवा प्रशासन या अहवालावर कुठल्याही प्रकारचे भाष्य करणार नाही वा चर्चेत सहभागीही होणार नाही. जो पर्यत या अहवालावर सभा निर्णय घेत नाही त्यानंतर हायकोर्टात चालू असलेल्या ट्रायफा वर्सेस महाराष्ट्र शासन यांचा निर्णय, महाराष्ट्र शासनाचे दि. ४ मार्च २०१४ चे जीआर या सर्व बाबींची चौकशी झाल्या शिवाय आयुक्त –प्र शासन या अहवालावर भाष्य करु शकत नाही. याबाबत नगरसचिवानी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीचा खुलासा करावा.

**अ.सत्तार** सर्वसाधारण सभेने ५ सदस्यांची उपसमिती कायम केली होती.त्यापैकी दोन सदस्यांनी राजीनामा दिलेला आहे.पाच सदस्यांच्या स्वाक्षरीने अहवाल यावयास पाहिजे होता तीनच सदस्यांच्या स्वाक्षरीने चौकशी अहवाल आलेला आहे. दोन सदस्यांनी का राजीनामा दिला याचा खुलासा करण्यात यावा.वास्तविक पाहता या दोन सदस्यांनी सर्वसाधारण सभेस आपला राजीनामा द्यावयास पाहिजे होता. चुकीच्या पध्दतीने राजीनामा दिलेला आहे. त्यामूळे आयुक्त साहेबांनी याचा खुलासा करावा. हा अहवाल पुढील सभेत ठेवण्यात यावा.

**प्रमोद खेडकर** दि. ३१.३.२०१५ ला उपमहापौर यापदावर श्री आंनद चव्हाण हे होते व श्री आनंद चव्हाण हे या उपसमितीचे अध्यक्ष होते त्यावेळी मी त्यांना सांगत होतो तुमचा उपमहापौर पदाचा कार्यकाळ लवकरच संपत आहे तुमचा कार्यकाळ संपण्यापुर्वी हा लवकरात लवकर अहवाल तयार करुन सर्वसाधारण सभेस शिफारस करावा .नियमाप्रमाणे तीन महिण्याच्या आत अहवाल सर्वसाधारण सभेस शिफारस करणे आवश्यक होते परंतु ते ऐकण्यास तयार नव्हते ते कोणाची तरी त्रयस्त मानसाची वाट पाहत होते. औरंगाबाद, पुणे, मुंबईला मानसे पाठविण्यात येत होती. उपसमितीचे अध्यक्ष श्री आनंद चव्हाण हे उपमहापौर पदावर असतानाच चौकशी अहवाल सर्वसाधारण सभेस द्यावयास पाहिजे होता तेंव्हा त्यानी का दिला नाही. सहा महिण्यानंतर अहवाल देण्यात आला याचा खुलासा करण्यात यावा.

**स. शेर अली** उपसमितीच्या ५ सदस्यापैकी ३ सदस्यांनी अहवाल सादर केलेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनूसार उपसमितीने किती दिवसात अहवाल द्यावयास पाहिजे होता. उपसमितीचे अध्यक्ष श्री आंनद चव्हाण यांना उपसमितीच्या दोन मिटिंगा घेवून लवकरात लवकर अहवाल तयार करुन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात यावी अशी आमची मागणी होती परतु त्यांनी आमचे ऐकले नाही. त्यामूळे आम्ही उपसमिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे.

हायकोर्टाचा निर्णय झालेला आहे रिलायन्स कंपनीने जे १५२ मोबाइल टॉवर बसविलेले आहे त्यास हायकोर्टाने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे परवानगी दिलेल्या मोबाइल टॉवर विरुध्द आपण कार्यवाही करु शकत नाही. आयुक्तांना ३२ (१) (इ)चा जनहितार्थ वापर करण्याचा अधिकार असून मो. कंपन्याना रिलीफ देवून मोबाईल टॉवरला एनओसी देण्याचा अधिकार असल्यामूळे त्यांनी एनओसी दिलेली आहे. हायकोर्टाचा निर्णय झालेला असल्यामूळे हायकोर्टाच्या निर्णयाचा आदर करुन आम्ही दोघानी उपसमिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे. जो अहवाल सादर करण्यात आलेला आहे त्यास काही अर्थ राहिलेला नाही.हा अहवाल फेटाळण्यात यावा. अशी विनंती आहे.

**प्रमोद खेडकर** श्री आंनद चव्हाण हे उपमहापौर यापदावर असतांना अहवाल सर्वसाधारण सभेसमोर का सादर करण्यात आलेला नाही आताच कसा काय अहवाल सादर करण्यात आलेला आहे याचा खुलासा करण्यात यावा.

**अ.सत्तार** ज्यांनी उपसमितीचा राजीनामा दिलेला आहे त्यांनी बोलू नये.

**आनंद चव्हाण** सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार उपसमितीने आपला अहवाल दिलेला आहे यावर सभागृहाने काय निर्णय घ्यावयाचा तो घ्यावा.

**स.शेर अली** उपसमितीस अहवाल सादर करण्यास एवढा विंलब का झाला याचा खुलासा करण्यात यावा.

**दिपकसिंह रावत** तत्कालिन महापौरांनी रिलायन्स संदर्भात चौकशी करण्याकरीता तत्कालिन उपमहापौर श्री आंनद चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची उपसमिती कायम केली होती. त्यापैकी दोन सदस्यांनी राजीनामे दिलेले आहेत. नियमानुसार उपसमितीची एक सभा झाल्यानंतर त्याचा अहवाल महापौर व आयुक्ताना द्यावयास पाहिजे १५ दिवसानंतर दुसरी सभा घेवून त्याचाही अहवाल महापौर व आयुक्त यांना द्यावयास पाहिजे व दोन बैठकीचा अहवाल दिल्यानंतर एका महिण्याच्या आंत उपसमितीने निर्णया घ्यावयास पाहिजे होता परतु तसा प्रकार झालेला नाही. फक्त महापौरांना व आयुक्तांना माहिती देण्याच्या संदर्भात पत्र देण्यात आले त्या पत्राची प्रत माझ्याकडे आहे. सहा महिणे झाले अद्याप निर्णय धेण्यात आलेला नाही. यामध्ये एकतर्फी निर्णय घेण्यात आलेला आहे. अहवालावर फक्त तीन सदस्यांची सही आहे. मोबाइल टॉवरच्या संदर्भात तत्कालिन विधान परिषद आमदार दिपक साळुंके पाटील यांनी विधान सभेत लक्षवेधी सुचना मांडून लेखी माहिती मागितली होती. त्यानुसार मोबाइल टॉवर उभारण्याचे संदर्भात शासनाने परिपत्रक काढले होते. यामध्ये महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत.

मोबाईल टॉवर कंपनी संघटना (टायफा) यांनीही मोबाइल टॉवर उभारणी सदर्भात लातूर महानगरपालिकेचे आयुक्त श्री तेलंग साहेब व शासन यांच्या विरुद हायकोर्टात याचिका दाखल केली होती. या याचिकेत हायकोर्टाने बेकायदेशिर मोबाइल टॉवरला सिल करण्याचे अधिकार नाही व त्याविरुध्द कार्यवाही करण्याचे अधिकार आयुक्तांना व महाराष्ट्र शासनास नाही असा निर्णय दिला होता. व हायकोर्टाचे निर्णयानुसार शासनाने परिपत्रक काढलेले आहे. या अहवालावरुन असे दिसून येते की, फक्त रिस्टोरेशन चार्जेस दरामध्ये तफावत आहे तेवढी दुरुस्ती करण्यात यावी बाकी इतर बाबतीत प्रशासन कुठे चुकले असे आम्हाला वाटत नाही. एमआरटिपी ऍक्ट, शासन परिपत्रक ,न्यायालयाचे आदेशानुसार आयुक्तानी कार्यवाही केली असेल तर ती चागली गोष्ट आहे. यामूळे महानगरपालिकेचे उत्पन्नात वाढ झालेली आहे. आज पर्यत शहरात टुजी, थ्रीजी कॅंबलवर आक्षेप का घेण्यात आलेला नाही, ४ जी वरच का आक्षेप घेण्यात आलेला आहे हा माझा प्रश्न आहे. श्री प्रमोद खेडकर यांनी सांगितल्याप्रमाणे कोणाची तरी वाट पाहण्यात येत होती. मोबाइल टावरची माहिती घेण्यासाठी औरंगाबाद, पुणे, मुबईला मानसे पाठविण्यात आल्याच्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या आहेत .प्रजावाणीतही बातमी प्रसिध्द झालेली आहे यामूळे महानगरपालिकेची बदनामी झालेली आहे. २ जी ,३ जीच्या वेळेस उपसमिती का कायम करण्यात आली नाही. ४ जीलाच उपसमिती का नेमण्यात आली. उपसमितीच्या अहवालास मान्यता देण्यात. येत असेल तर मी ऍसऐ महापौर व या अहवालास समर्थन देणा-या नगरसेवकांच्या विरोधात नागरीक या नात्याने न्यायालयात दाद मागील.या अहवालास मान्यता देवून शासनास शिफारस करण्याच्या प्रस्तावास शिवसेना व भाजच्या सदस्यांचा कडाडून विरोध आहे. प्रशासनाने शासन आदेश व ,न्यायालयाचे आदेशानुसार कार्यवाही केली असल्यामुळे उपसमितीचा अहवाल फेटाळण्यात यावा. ज्यांना ज्यांना अहवालास विरोध करावयाचा आहे त्यांनी आपला विरोंध नोंदवावा.

**स.शेर अली** — या अहवालास एएमआय पक्षाच्या नगरसेवकांचा विरोध आहे.

**आनंद चव्हाण** — सर्व प्रथम मी या सभागृहाचे अभिनंदन करतो की, याच सभागृहाने दि. ३१.३.२०१५ रोजी डंकीन येथे झालेल्या सभेत ४ जी अंतर्गत केबल टाकण्याच्या व मोबाईल टॉवरच्या संदर्भात जी अनियमितता झाली त्याची चौकशी करण्यासाठी व होत असलेली अनियमितता बद करावी असा निर्णय घेतला होता.परंतु सर्वसाधारण सभेने दि. ३१.३.२०१५ रोजी घेतलेल्या निर्णयाची प्रशासनाने कुठलिही दखल घेतलेली नाही. प्रशासनाने दि. २७.४.२०१५ रोजी केबल टाकण्यासाठी परवानगी दिली व दि. ११.५.२०१५ रोजी मोबाईल टॉवर उभारण्यास एनओसी दिली. प्रशासनास परवानगी देण्याचे अधिकारी आहेत ते एनओसी देवू शकतात. मोरेश्वर कंन्स.ला देयकांची अदाई करण्यासाठी स.सदस्यानी सर्वसाधरण सभेत प्रस्ताव टाकला की आयुक्त त्यांचे ७० लाखाचे चेक देतात हा अपवाद कसा असा माझा प्रश्न आहे.

**आयुक्त** — आपण कोणाला सवाल करीत आहात प्रशासन या विषयावर होत असलेल्या चर्चेत भाग घेणार नाही. स.सदस्यांना विनंती आहे की, या अहवालाचे अनुषंगाने आयुक्तास कोणत्याही प्रकारचे प्रश्न विचारुन उत्तर मागू नये.

**आनंद चव्हाण** — मी महापौरांना बोलत आहे आपणासही विचारु शकतो.

**उमेश चव्हाण** — हा विषय पत्रिकेवर विषय आहे या विषयावर प्रशासन चर्चेत भाग धेणार नाही. चर्चेत भाग घ्यावयाचा नसेल तर हा विषय विषय पत्रिकेवर का धेण्यात आला.

**आयुक्त** — आयुक्त हा शब्द चर्चे आला नाही पाहिजे आणि इतिवृत्ततही आला नाही पाहिजे त्याची नोंद इतिवृत्ताता घेण्यात यावी.

**आनंद चव्हाण** — इतिवृत्तांत आले नाही पाहिजे चर्चेत आले नाही पाहिजे असे सांगण्याचे अधिकार महापौरांनी आपणास दिलेले आहे काय महापौरांचे तसे आदेश असेल तर हा विषय पटलावर का घेण्यात आला

**अ.सत्तार** — इतिवृत्तातात चर्चा घ्यावयाची नसेल तर महारपौरांनी निर्णय घ्यावा चलो

**महापौर** — या अहवालावर जे सदस्य बोलतील ते सर्व इतिवृतात येईल नगरसचिवानी सर्व इतिवृत्तामध्ये सदस्याच्या चर्चेची नोंद घ्यावी.

**आयुक्त** — मी शासनाची बाजू मांडत आहे. प्रकरण न्याय प्रविष्ट असून शासन प्रतिवादी आहे त्यामूळे मला या चर्चेत भाग घेता येणार नाही. हा विषय मा.महापौरांचा सर्वसाधारण सभेचा विषय आहे, प्रशासनाचा नाही ही उपसमिती महापौरांनी कायम केलेली आहे. या विषयास प्रशासनाचे अनुमोदन नाही. त्यामूळे प्रशासन या विषयाच्या चर्चेत भाग घेणार नाही. याविषयावर सभागृहास जो काही निर्णय घ्यावयाचा आहे तो सभागृहाने निर्णय घ्यावा. महाराष्ट्र शासन ,महानगरपालिका अधिनियमान्वये मी शासनाचा प्रतिनिधी म्हणून बोलत आहे. शासनाने मला त्यांचा प्रतिनिधी म्हणून प्रतिनियुक्तीवर पाठविलेले आहे.मोबाइल टॉवर उभारणी संदर्भात सुप्रिम कोर्ट व हायकोर्ट मध्ये दाखल झालेल्या याचिकेत शासन प्रतिवादी आहे त्यामूळे महाराष्ट्र

शासनाचा अनादर होत असेल तर मी शासनावर अनादर दाखविण्यार नाही.नगरसचिव हे महापौराचे वतीने सेक्रेटरी असिस्टंट म्हणून काम करीत आहेत.ते आपणस महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीचा खुलासा करतील

**आनंद चव्हाण** दि. १३.४.२०१५ मी उपसमितीची बैठक घेतली त्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून व नगररचना विभागाकडून माहिती मागविण्याचे ठरविण्यात आले होते त्यानुसार दि. १४.७.२०१५ ला संबंधित विभागाला पत्र देण्यात आले परंतु संबंधित विभागानी सहकार्य केलेले नाही. दि. १३.७.२०१५ आयुक्त साहेबानाही पत्र दिले होते या पत्रावर उपसमितीच्या ५ सदस्यांच्या सहया आहेत. ते पत्र सभागृहात दाखविण्यात येते. माझा उपमहापौर पदाचा कार्यकाळ दि. ३०.४.२०१५ ला सपंल्यानंतर आम्ही मिटिग घेतली माझा कार्यकाळ दि. ३०.४.२०१५ ला संपल्यानंतर पत्रावर ५ सदस्यांनी दि. १४.७.२०१५ रोजी सहया कश्या काय केल्या मी सदस्यांना बोलणार नव्हतो परंतु स.सदस्य आपल्या मध्ये भांडणे लावून प्रशासनास प्रशासनाची बाजु मान्य करण्यासाठी समर्थन देत आहे.

यामध्ये अनियमितता झालेली आहे उपसमिती वैध आहे अवैध आहे हे नंतर ठरवा , उपसमितीने जो अहवाल दिलेला आहे तो महानगरपालिकेच्या हिताचा आहे किंवा नाही यावर विचार करण्यात यावा. उपसमितीने तीन महिणे अभ्यास करुन अहवाल सर्वसाधारण सभे पुढे ठेवलेला आहे.त्यावर विचार करावा मला एकच सांगावयाचे आहे की, महानगरपालिकेच्या हिता करीता व उत्पन्न वाढीकरीता ही उपसमिती कायम केली होती उपसमिती वेगळी ,सभागृह वेगळे प्रशासन वेगळे अशी भूमिका घेवू नये. उत्पन्न वाढीसाठी शिफारस करणे योग्य असेल तर प्रधान सचिव ,नगरविकास विभाग यांचेकडे अहवाल पाठविण्यात यावा. नसता अहवाल कचरा कुंण्डीत टाकावा. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवावयाचे किंवा नाही याबाबत सभागृहाने निर्णय घ्यावा.

**प्रमोद खेडकर** मी एक वर्षापुर्वी पोटनिवडणूकीत निवडूल आलो त्यापुर्वी आंनद चव्हाण उपमहापौर म्हणून पदावर काम करीत आहे. त्यावेळी त्यांना महानगरपालिकेचे हित दिसले नाही काय, उत्पन्न वाढीचे सुचले नाही काय त्यावेळी ते झोपले होते काय उपसमितीचे अध्यक्ष श्री आंनद चव्हाण यांना वारंवार आम्ही उपमहापौर पदावर असतांनाच अहवाल देण्यात यावा असे सांगत होतो परंतु त्यांनी ऐकलेले नाही. ते कोणाची वाट पाहत होते.

**स.शेर अली** या अहवालात असा उल्लेख करण्यात आलेला आहे की, रिलायन्स कंपनीला मोबाईल टॉवर उभारण्यासाठी व रिलायन्स ४ जी चे भूमी अंतर्गत केंबल टाकण्यासाठी जे ना हरकत प्रमाणपत्र व समती देण्यात आलेली आहे ते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदीनूसार व शासन राजपत्रातील अटी व शर्ती प्रमाणे देण्यात आलेल्या आहेत किंवा नाही याची डायरेक्ट ऑफ टावून प्लॅनिग पुणे व मा.प्रधान सचिव,नगरविकास मंत्रालय महाराष्ट्र राज्य यांचे मार्फत् सविस्तर चौकशी करण्यासाठी ही गठित केलेली उपसमिती एकमताने महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस शिफारस करते.या मध्ये कोणते एकमत झालेले आहे. उपसमितीत ५ सदस्य होते त्यापेकी दोन सदस्यांनी राजीनामा दिलेला आहे. एकमताने कसे काय म्हणता येईल, उपसमितीचा अहवाल चुकीचा आहे सभागृहास अंधारात ठेवून चुकीचा व खोटा अहवाल दिलेला आहे तो फेटाळण्यात यावा.

**आनंद चव्हाण** टाईप मिस्टेक आहे सर्वानुमते ऐवजी बहुमताने असे समजावे.

**बाळासाहेब देशमूख** त्यावेळी सर्वसाधारण सभेत असे ठरले होते की, सर्व पक्षाच्या नगरसेवकांना विश्वासात घेवून उपसमिती कायम करण्यात यावी. परंतू तसे काही झालेले नाही. ही उपसमिती कशाच्या आधारावर कायम करण्यात आली संख्याबळानुसार कायम करण्यात आलेली आहे

**नगरसचिव** मा. हायकोर्ट मुंबई येथील रिट याचिका क्र.२०१३/२०१४ टाईफा वर्सेस महाराष्ट्र शासन, टाइफा इन्फ्रा प्रो.असो.वर्सेस म्युनसिपल सेक्रेटरी या याचिकेमध्ये सुप्रिम कोर्टाने १२ सप्टेंबर २०१४ व दि. २८.८.२०१४ चे निर्णयाव्दारे स्पेसिफीक निर्देश दिलेले आहे मा .उच्च न्यायालयाने महानगरपालिका, स्थानिक प्राधिकरणाने मोबाइल टॉवर विरुध्द कोणतीही कार्यवाही करु नये आणि तश्या प्रकारची कार्यवाही केली असेल तर विज पुरवठा खंडीत केला असेल तर विज पुरवठा पुर्ववत सुरळीत करावा दुसरे असे स्पेसिफीक आदेश आहेत की, संबंधित टॉवरधारकाचे मोबाइल टॉवरचे अर्ज स्थानिक प्राधिकरणाने टेलिकम्युनिकेशन डिपार्टमेंटच्या नॉर्म्स प्रमाणे स्विकारुन निर्णय घ्यावा असे स्पेसिफिक निर्देश आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, सभेचे कामकाज नियमातील तरतूदीनूसार प्रकरण न्याय प्रविष्ट असेल तर त्यावर सभागृहात चर्चा करता येत नाही भाष्य करता येत नाही, त्यामूळे या विषयावर चर्चा किंवा कोणत्याही प्रकारचे भाष्य करणे उचित होणार नाही असे माझे नगरसचिव या नात्याने कायदेशिर मत आहे. आणि ही बाब मी उपसमितीच्याही निदर्शनास आणून दिलेली आहे.

**रामनारायणजी काबरा** नगरसचिवांनी हा खुलासा अगोदर केला असता तर एवढी चर्चा झाली नसती. जी उपसमिती कायम करण्यात आली त्या उपसमितीत सर्व पक्षाचे नगरसेवक आहेत का यामध्ये राष्ट्रवादी पक्षाचा सदस्य दिसत नाही. माझे असे म्हणणे आहे की जेव्हा दोन सदस्यांनी उपसमिती सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता तर त्याच वेळी त्या रिक्त दोन जागेवर दोन सदस्यांची निवड करावयास पाहिजे होती. तीन सदस्यांचे अहवालावर निर्णय धेणे चुकीचे आहे प्रकरण न्याय प्रविष्ट असेल तर त्यावर आपणास चर्चा करता येत नाही असा खुलासा करण्यात आलेला आहे मग आपण कोर्टाच्या विरोधात चर्चा करीत आहोत काय करीत असलेल्या चर्चेला लिगलिटी आहे काय, निश्चित स्वरुपाचे मार्गदर्शन करु शकतो काय याचाही विचार होणे आवश्यक आहे.

**आनंद चव्हाण** आदरणिय नगरसचिवांनी प्रकरण न्याय प्रविष्ट असुन ते हायकोर्टात पेडींग असल्यामूळे त्यावर चर्चा करत येत नाही असा खुलासा केलेला आहे परंतु कोणत्या केर्टात प्रकरण चालू आहे आपला काय सबंधी आहे याबाबत खुलासा केलेला नाही. मोबाईल टॉवर उभारणी संदर्भात न्यायमुती श्री अभय ओक व श्री गौतम पाटील यांनी दि.२६ तारखेला निर्णय दिलेला आहे. मा.आयुक्त साहेबाचे जन्मगाव व कर्मभूमी असलेले ठाणे शहरातील वकील श्री राम आपटे यांना आपण मोबाइलवर विचारु शकता .न्यायालयाचे निर्णयाची प्रत माझ्याकडे आहे.त्यामध्ये असा निर्णय झालेला आहे की, विना परवानगीने बांधण्यात आलेल्या बेकायदेशिर इमारतीवर मोबाईल टॉवर उभारण्याकरीता परवानगी देता येत नाही. परंतु नांदेड शहरात अशा किती तरी बेकायदेशिर इमारतीवर मोबाइल टावर उभारण्यात आलेले आहे.रस्ते किती फुटाचे आहेत ते सुध्दा ज्ञात नाही. त्याचा मॅप नाही, बांधकाम उपविधीमधील नियमा अंतर्गत नियम ३२ (१) (इ) चा वापर जनहितार्थ केला असे सांगण्यात येत आहे. यामध्ये काय जनहितार्थ आहे. मोंबाईल कंपन्या पैसे कमावतात त्यांनी महानगरपालिकेस फ्रि ऑफ कॉस्ट २ एमएमजीएसची सेवा उपलब्ण्द करुन दिलेली आहे काय एक रुपया प्रतिचौरस फुट प्रतिवर्ष असे भू भाडे लावण्याचा अधिकार आयुक्तास कोणी दिला भाडे ठरविण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेस ,स्थायी समितीस आहे. रोड रिस्टोरेशन चार्जेस रु. ७५०/-डिएसआर प्रमाणे निश्चित करणत आले हे जर सर्वसाधारण सभेत स्थायी समिती समोर आणले असते तर इतर महानगरपालिकेतील दराचा विचार करुन निर्णय घेता आला असता पुणे महानगरपालिकेचा दर ५८००/- मुंबई महानगरपालिकेचा दर रु.१०,०००/- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा दर रु.६७००/- आहे.सोलापूर महानगरपालिकेचा दर १७५०/- आहे. आरसी रेट ठरविण्यासाठी सर्वसाधारण सभेत प्रस्ताव का सादर करण्यात आला नाही. ७५०/-हा दर कशाच्या आधारावर निश्चित करण्यात आला महानगरपालिकेचा फायदा पाहणार की नुकसान पाहणार आहात. अनियमितता झालेली असल्यामूळे याची चोकशी करावी प्रशासनाकडून झालेली चुक आपण सुधारु शकतो. संबधित कंपनीशी जो करारनामा केलेला आहे तोही चुकीचा करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३ (क) (ड) नुसार करारनाम्यावर दोन स्थायी समिती सदस्यांच्या किंवा उपआयुक्त ,नगरसचिव यांच्या सहया घेण्यात आलेल्या नाही. करारनाम्यावर फक्त कार्यकारी अभियंता यांची सही आहे त्यामूळे चुकीचा करारनामा करण्यात आलेला आहे. अनियमितता झालेली असल्यामूळे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवावयाचे असेल महानगरपालिकेचे हित पहावयाचे असेल तर प्रधान सचिव,नगरविकास यांचेकडे चौकशी अहवाल पाठविण्यात यावा. महानगरपालिकेस उत्पन्न नको आहे काय हा जीबीचा अपमान नाही काय जीबीने ठराव पास केला म्हणून मोरेश्वर कंपनीला हायकोर्टाच्या निर्णयाची पायमल्ली करुन ७० लाख रुपये दिलेले आहेत.

**प्रमोद खेडकर** २ जी ,३ जी च्या वेळेस महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी अशा प्रकारचा निर्णय का घेण्यात आलेला नाही. ४ जीचे बाबतीत का सभाजीनगरला एक जण जातो,मुंबई ,पुणेला एक जण जातो कशा करीता ,लवकरात लवकर निर्णय धेण्यासाठी उपसमितीचे अध्यक्षांना सांगतो होतो परंतु ते ऐकत नव्हते,

**आनंद चव्हाण** मा.महापौराना विनंती आहे की ,महानगरपालिकेच्या हितासाठी व उत्पन्न वाढीसाठी उपसमितीचा अहवाल प्रधान सचिववाकडे पाठविण्याचा निर्णय घ्यावा.

**प्रमोद खेडकर** नगरसचिवांनी हे प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याचे कागदपत्र आम्हाला दाखविले म्हणूनच आम्ही उपसमिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे.

**स.शेर अली** श्री खेडकर यांनी जे सांगितले ते बरोबर आहे प्रकरण न्याय प्रविष्ट असल्यामूळे अहवालावर निर्णय घेता येत नाही. अहवाल फेटाळण्यात यावा.

**प्रमोद खेडकर** उपसमितीच्या सदस्यांनी सहया करुन महापौरांना व आयुक्तांना पत्र दिल्याचे सांगण्यात येते ते पत्र महापौरांना व आयुक्तांना कोणत्या तारखेस दिले त्याचा इनवर्ड नंबर आहे काय पत्र मिळाल्याची रिसिव्हड आहे काय याचा खुलासा करण्यात यावा.

**दिपकसिंह रावत** श्री प्रमोद खेडकर यांनी सांगितल्या प्रमाणे इनवर्ड नंबर व पत्राच्या तारखेचा खुलासा करण्यात यावा.

| | |
|---|---|
| **महापौर** | उपसमितीच्या अध्यक्षानी स्वतः भेटून मला उपसमितीचे सदस्य असलेल्या पाच सदस्याचे सहयाचे पत्र मला दिलेले आहे. या पत्रावर पुढील कार्यवाही करण्यासाठी कव्हरीग पत्रासोबत पत्र जोडून आयुक्तांना पाठविलेले आहे. |
| **दिपकसिंह रावत** | महापौरांचे पत्र उपसमितीच्या पत्रासह आयुक्त साहेबानां मिळाले. |
| **महापौर** | या विषयाच्या चर्चेत आयुक्त सहभागी होणार नाही असे त्यानी अगोदरचा जाहिर केलेले आहे ,त्यामूळे सदर पत्र आयुक्तांना मिळालेले किंवा नाही याचा खुलासा मला करता येणार नाही. |
| **अशोक उमरेकर** | नगरविकास विभागचे राज्यमंत्री यांनी उपसमितीचा अहवाल हा नगर विकास विभागाचे प्रधान सचिव श्री म्हैसकर यांचे मार्गदर्शन घेवून सादर करण्यात यावा असे सांगितलेले आहे. व त्याचे तसे पत्र आलेले आहे. |
| **आनंद चव्हाण** | एकमेकात वाद घालण्याऐवजी हाय कोर्टाचा निर्णय झालेला असल्यामूळे आपणास काहीच अडचण येणार नाही. उपसमितीने जो अहवाल दिलेला आहे तो प्रधान सचिव नगर विकास वि. यांना सादर करण्यात यावा. रिलायन्स करलो दुनिया मुठठीमे त्याप्रमाणे रिलायन्सने महानगरपालिकेच्या काही सदस्यांना मुठठीत घेतले असल्याचे दिसून येते त्यामूळे ते महानगरपालिकेचे हित पाहत नाही . |
| **स.शेर अली** | यामध्ये खुप मोठी चिरिमिरी झालेली आहे. |
| **दिपकसिंह रावत** | कायदा काय म्हणतो हे प्रकरण न्याय प्रविष्ठ असताना हा विषय विषय पत्रिकेवर का घेण्यात आला. न्याय प्रविष्ट प्रकरणात सभागृहास निर्णय घेता येतो काय याचा खुलासा करण्यात यावा. |
| **आनंद चव्हाण** | प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्याचा चुकीचा खुलासा करण्यात आलेला आहे. परंतु सदर प्रकरणात हायकोर्टात निर्णय झालेला आहे. |
| **विरेंद्रसिंघ गाडीवाले** | उपसमितीचा अहवाल प्रधान सचिव ,नगरविकास याचंकडे सादर करण्याचा प्रस्ताव आलेला आहे. प्रशासन म्हणते की आम्ही जी काही कार्यवाही केलेली आहे ती कायदेशिर केलेली आहे त्यात कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नाही. उपसमिती म्हणते यामध्ये अनियमितता झालेली आहे. प्रशासनाचे व लोकप्रतिनिधी समितीचे एक मत होत नसल्यामूळे उपसमितीने पर्याय सुचवून अहवाल प्रधान सचिवाकडे सादर करुन प्रकरणाची चौकशी करण्याची शिफारस केलेली आहे यात चौकशी या शब्दाऐवजी आपण अभिप्राय असे म्हणु शकतो तशी दुरुस्ती करावी असे मला वाटते. प्रशासनाचे व लोकप्रतिनिधीचे वेगवेगळे मत आहेत त्यावर आपण निर्णय धेवू शकत नाही त्यामूळे अनियमितता झाली आहे किंवा नाही याचा अभिप्राय घेण्यासाठी प्रधान सचिवांकडे अहवाल पाठविण्यात काही गैर नाही परंतु यासाठी सर्वसाधारण सभेच्या ठरावाची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही.कारण उपसमितीच्या सदस्यां सौ.सुदर्शना खोमणे यांनी शासनाकडे उपसमितीच्या अहवालानुसार चौकशी करण्याची मागणी केली असल्याचे समजते. स्थानिक आमदारही त्यावर विचार करतील.हा तारांकित प्रश्न होवून त्यावर विधान सभेतही चर्चा होवु शकते. शासन कोणती भूमिका घेईल हे आज सांगता येत नाही. नागरीकांना स.सदस्यांना महानगरपालिकेत अनियमितता होत असेल तर त्याबाबत शासनाकडे तक्रार करण्याचा अधिकार आहे त्यामूळे या प्रकरणात महानगरपालिकेने ठराव घेण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. |
| **नगरसचिव** | कोणत्याही नागरीकांस महानगरपालिकेच्या कोणत्याही कामकाजात अनियमितता झाली असे वाटत असेल तर त्यांना शासनाकडे तक्रार करण्याचा अधिकार आहे. |
| **विरेंद्रसिंघ गाडीवाले** | अनियमितता झाली नसल्याच्या भूमिकेवर प्रशासन ठाम आहे .चौकशी अहवालानूसार सभागृहातील काही सदस्याचे मत आहे की, यामध्ये अनियमितता झाली आहे तर काही स.सदस्यांचे मत आहे की अनियमितता झालेली नाही यामध्ये एकमत होत नाही. त्यामूळे या विषयावर बहुमताने निर्णया घ्यावा लागेल. |
| **महापौर** | सभागृहातील बहुसंख्य सदस्याचे मत विचारात धेता उपसमितीने सादर केलेला चौकशी अहवाल प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय मुबई यांचेकडे सादर करण्यास बहुमाने मान्यता देण्यात येते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. |
| **स.शेर अली** | हा न्यायालयाचा अवमान आहे. चुकीचा अहवाल आलेला असल्यामूळे हा अहवाल फेटाळण्यात यावा. अहवाल मान्यता देण्यात येत असेल तर त्यास एमआयएम सदस्यांचा विरोध नोंदविण्यात यावा. |
| **दिपकसिंह रावत** | न्यायालयाचा अवमान आहे. महापौरांनी दिलेल्या निर्णयास शिवसेना भाजप सदस्यांचा विरोंध आहे. आमचा विरोध नोंदविण्यात यावा. |
| **आयुक्त** | मा.महापौरांनी जी रुलींग दिली, सभागृहाने जी चर्चा केली ती संपुणतः प्रशासन, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ,महाराष्ट्र शासन , एमआरटिपी ॲक्ट १९६६ या वर केली आहे. त्यामध्ये प्रशासनाने चर्चेत भाग घेतलेला नाही. व प्रशासनाची कुठल्याही प्रकारची भूमिका नव्हती.सभागृहाने मान राखला नाही याची |

सर्वस्वी जबाबदारी मा.महापौरांनी रुंलींग दिली ज्या सदस्याचा सपोट होता त्यांची राहिल. यामध्ये प्रशासनाची कोणतीही भूमिका नाही. प्रशासन मनपा अधिनियम यांचेशिवाय महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६६ ,प्रधान सचिव १, नगर विकास अंतर्गत सभागृहाने यावर चर्चा केली महापौरांनी जी काही रुंलींग दिली त्याचेमध्ये प्रशासनाची कोणत्याही प्रकारची भूमिका नव्हती. व्यक्तीगत नगरसचिव हे केवळ महानगरपालिका अधिनियमातील कार्यपध्दतीनुसार सभागृहास सेक्रेटरी असिस्टंट म्हणून काम करीत होते अशा परिस्थितीमध्ये व्यक्तीगत नगरसचिव, त्याचे संपुर्ण कर्मचारी आणि प्रशासन म्हणून आयुक्त व त्यांचे टिमने चर्चेत भाग घेतलेला नाही किंवा कोणतीही आपली भूमिका मांडलेली नाही. या प्रकरणात मा.उच्च न्यायालयाचा अवमान झाला असेल तर त्याची जबाबदारी प्रशासनावर राहणार नाही हे माझे मत इतिवृत्तात नोंदविण्यात यावे. आम्ही पार्टी होणार नाही.

**ठराव क्र. ८८** **ठराव**

नांवामनपा सर्वसाधारण सभेने ठराव क्र.२४५ दि.३१.३.२०१५ अन्वये मनपा हद्दीत विविध भागात रिलायन्स 4G या अंतर्गत भूमिगत केबल लाईन टाकण्याचे काम त्वरीत थांबविण्यात यावे तसेच सदर कंपनीचे मोबाईल टॉवर उभे करण्याचे अथवा त्यास केबल जोडणीचे काम चालू असल्यास ते देखील तात्काळ थांबविण्यात यावे. तसेच सदरील झालेले काम व पुढे काम सुरु करण्याच्या निर्णय घेण्यासाठी तत्कालिन उपमहापौर श्री आनंद चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली श्री उमेश चव्हाण, श्री स.शेर अली, सौ.सुदर्शना महेश खोमणे, श्री प्रमोद खेडकर, श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियता यांची एक उपसमिती कायम केली होती, (या उप समितीचे स. सदस्य श्री श्री प्रमोद खेडकर, व श्री स.शेर अली यांनी दि.९.१०.२०१५ रोजी उपसमिती सदस्य पदाचा राजीनामा आयुक्त, नांवामनपा नांदेड याचेकडे दिलेला आहे.) या उपसमितीने दि.३१.१०.२०१५ रोजी मा.महापौर नांवामनपा नांदेड यांच्याकडे खालील प्रमाणे आपला अहवाल सादर केलेला आहे.

**<u>मनपा हध्दीत विविध भागात रिलायन्स ४ जी या अंतर्गत भूमिगत केबल लाईन टाकण्याचे कामाची तसेच शहरात उभारण्यात आलेल्या मोबाईल टॉवरची चौकशी करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या उपसमितीचा अहवाल</u>**

नांवामनपा सर्वसाधारण सभेने ठराव क्र.२४५ दि.३१.३.२०१५ अन्वये मनपा हद्दीत विविध भागात रिलायन्स 4G या अंतर्गत भूमिगत केबल लाईन टाकण्याचे काम त्वरीत थांबविण्यात यावे तसेच सदर कंपनीचे मोबाईल टॉवर उभे करण्याचे अथवा त्यास केबल जोडणीचे काम चालू असल्यास ते देखील तात्काळ थांबविण्यात यावे. तसेच सदरील झालेले काम व पुढे काम सुरु करण्याच्या निर्णय घेण्यासाठी उपमहापौर श्री आनंद चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली श्री उमेश चव्हाण, श्री स.शेर अली,सौ.सुदर्शना महेश खोमणे, प्रमोद खेडकर, श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियता यांची एक उपसमिती कायम करण्यास मान्यता देवून समितीचा मंजुरी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय मनपा प्रशाससनाने सदरील काम सुरु करण्यात येवू नये असा ठराव संमत केला होता.

सदर ठरावान्वये प्राप्त झालेल्या अधिकारान्वये उपरोक्त समितीचे अध्यक्ष श्री आनंद चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली व उपसमितीचे सर्व सदस्य यांच्या उपस्थितीत दि.१३.४.२०१५ व दि.१४.७.२०१५ रोजी बैठक घेवून या बैठकीत सदस्यांनी काही सुचना व माहिती मागविलेली होती. या अनुषंगाने सविस्तर चर्चा विनिमय होवून सदर प्रकरणाची सविस्तर चौकशी करुन उपसमिती खालील प्रमाणे निष्कार्षावर आली.त्यासबंधीचा चौकशी अहवाल.

१) मा.आयुक्तांना बाधकाम उपविधी मधील नियम ३२ (१) (इ) चा वापर फक्त महानगरपालिका बिल्डींग बॉयलॉज अंतर्गत मनपा हदीतील बिल्डींग परवानगीसाठीच वापरण्याचे अधिकार आहेत. मोबाईल टॉवरर्स उभारण्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाने दि.४ मार्च २०१४ रोजी एक वेगळी उपविधी केली आहे. त्या उपविधीचा वापर न करता मा.आयुक्तानी बांधकाम उपविधीमधील नियमा अंतर्गत नियम ३२ (१) (इ) चा वापर करुन त्यांच्या विशेष अधिकारात रिलायन्स कंपनीच्या २६ मोबाइल टॉवर ला परवानगी दिलेली आहे. मोबाइल टॉवर उभारण्यासाठी एनओसी देण्याकरीता महाराष्ट्र शासनाने ४ मार्च २०१४ चे जे राजपत्र काढलेले आहे त्यामध्ये २१ प्रकारच्या अटी व शर्ती टाकण्यात आलेल्या आहेत.त्याची पूर्तता न करता उदा.इमारत १५ मिटरपेक्षा उंच असणे ,रोड विडथ ,फायर एनओसी ,बांधकाम पुर्णत्वाचा दाखला इमारतीचे स्ट्रक्चरला ऑडीट तपासण्यात आले नाही,विकास खर्च वसुल करण्यात आलेला नाही. ही बाब मोबाइल टॉवर उभारण्याकरीता एनओसी देण्यात आलेल्या आहेत.जे की बेकायदेशिर व महानगरपालिकेच्या हिताच्या विरुध्द आहे त्यामूळे देण्यात आलेल्या परवानग्या रध्द करण्यात याव्यात.

**२)** बांधकाम उपविधीमधील नियमा अंतर्गत नियम ३२ (१) (इ) चे वापर करुन प्रस्ताव धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेच्या महासभेपुढे आणणे आवश्यक असतांना तसा प्रस्ताव महासभेकडे आणण्यात आलेला नाही.

**३)** मोबाईल टॉवर ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे जरुरीचे होते तर शासनाने केलेली टॉवरर्स उभारणीचे दि.४.३.२०१५ च्या उपविधीनुसार काही शंका असल्यास त्याचे निरसण करण्यास नियम १० नुसार शासनाचे मार्गदर्शन घेतलेले नाही.

**४)** जर मोबाईल टॉवर विना परवानगीने उभारण्यात आलेले असतीलन तर पुणे व इतर महानगरपालिकेने तडजोड शुल्क आकारुन दंड लावून परवानगी अधिकृत केली त्याप्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत अमलबजावणी झालेली नाही. यामूळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

५) ४ जी अंतर्गत रिलायन्स कंपनीला रोड खोदण्याची परवानगी देण्यात आली व त्याचे रिस्टोरेशन चार्जेस हे कमी असून तेच दर जर पुणे व इतर महागनरपालिकेच्या धर्तीवर वसुल केले असते तर नादेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले असते.

६) ४ जी अंतर्गत रिलायन्स कंपनीला परवानगी दिलेल्या मंजुर नकाशापेक्षा जास्त खोदकाम झालेले आहे. जास्तीचे झालेले खोदकामावर दंड लावून ते सबंधित कंपनीकडून वसुल करावयास पाहिजे होते ते करण्यात आलेले नाही. तसेच महानगरपालिकेचया मलनिस्सारण व पाणी पुरवठा विभागाचा अहवाल देखील घेण्यात आलेला नाही.

७) महानगरपालिकेच्या जमिनीचे भू भाडे व रोड रिस्टोरेशन चार्जेस,मोबाईल टॉवरचे दर ठरविण्याचा अधिकार महानगरपालिकेच्या स्थायी समिती अथवा सर्वसाधारण सभेस असतांना तसे न करता मा.आयुक्त यांनी स्वत:च्या अधिकारात भू भाडे ठरविले त्यामूळे इदतर महानगरपालिकेच्या तुलनेने ते भू भाडे नांदेड वाघाळा शहर महागनरपालिकेने कमी दराने घेण्यात आले असल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.व तसेच रिलायन्स ४ जी कंपनीशी करार करतांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३ (क) (ड) अंतर्गत येणा-या तरतूदीची पण पायमल्ली करुन करारनामा करण्यात आलेला आहे.

८) मा.महापौर व मा.आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांना दि.१.७.२०१५ रोजी रिलायन्स ४ जी अंतर्गत केंबल टाकण्याचे व मोबाईल टॉवर उभारण्याचे काम चालू आहे. ते त्वरीत थांबविण्या बाबतचे व संबंधित कामामध्ये अनियममितता झाल्यामूळे त्यांची चौकशी करण्यासाठी उपसमितीच्या सदस्यांनी पत्र दिले होते.

९) दि.३१.३.२०१५ रोजी सर्वसाधारण सभेत ठराव पारीत झाल्यावर सुध्दा सर्वसधारण सभेच्या निर्णयाची दखल न धेता व उपसमिती गठित असतांना देखील रिलायन्स कंपनीला केबल टाकण्यासाठी दि.२७.४.२०१५ ला रस्ता खोदकामाची परवानगी देण्यता आली तसेच दि.११.५.२०१५ रोजी (२७) मोबाईल टॉवरला ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे त्यामूळे मा.आयुक्त यांनी घेतलेल्या निर्णयाशी गठित करण्यात आलेल्या उपसमितीचे अध्यक्ष व उपसमितीचे सदस्य यांच्यात मतभिन्नता आहे.

तरी रिलायन्स कंपनीला मोबाईल टॉवर उभारण्यासाठी व रिलायन्स ४ जी चे भूमी अंतर्गत केंबल टाकण्यासाठी जे ना हरकत प्रमाणपत्र व समंती देण्यात आलेली आहे ते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदीनूसार व शासन राजपत्रातील अटी व शर्ती प्रमाणे देण्यात आलेल्या आहेत किंवा नाही याची डायरेक्ट ऑफ टावून प्लॅनिग पुणे व मा.प्रधान सचिव,नगरविकास मंत्रालय महाराष्ट्र राज्य यांचे मार्फत् सविस्तर चौकशी करण्यासाठी ही गठित केलेली उपसमिती एकमताने महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस शिफारस करते.

करीता मा.प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई, महाराष्ट्र राज्य यांना महानगरपालिका हध्दीत विविध भागात रिलायन्स ४ जी या अंतर्गत भूमिगत केबल लाईन टाकण्याचे कामाची तसेच शहरात उभारण्यात आलेल्या मोबाईल टॉवरची चौकशी करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या उपसमितीने सादर केलेल्या उपरोक्त चौकशी अहवालावर नियमानुसार पूढील योग्य ती कार्यवाही करण्यासाठी ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बहुमताने शिफारस करते,व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

<u>पुरवणी विषय पत्रिका</u>

**विषय क्र.१**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीत लातूर फाटा ते वसंतराव नाईक कॉलेज सिडको पर्यत बीटी रस्ता करणेसाठी उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन सदर काम तातडीने पुर्ण करणे गरजेचे असल्यामूळे आवश्यक बाबीचा समावेश करुन जिल्हा दर सुचि २०१४-२०१५ नुसार रु.२,८३,८५,९००/- चे अंदाजपत्रक सादर केले आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च रु. रु.२,८३,८५,९००/- यास प्रशासकीय व आर्थिक मंजुरीसाठी प्रस्ताव मु.प्रा.म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम २ नुसार सर्वसाधारण सभे समोर सादर.

**दिपकसिंह रावत** — या कामाकरीता अंदाजपत्रकात तरतुद नसताही हा प्रस्ताव कसा काय घेण्यात आला. स.सदस्यांना विनंती आहे की. स्नेहा पांढरे यांचा जो प्रस्ताव आहे त्या प्रस्तावासही या प्रस्तावा बरोबर मान्यता देण्यात यावी. शहरातील विकास कामे करण्यासाठी सर्वाना समानतेने न्याय देण्यात यावा.अंदाजपत्रकात तरतूद नसेल तर शिल्लक असलेल्या तरतूदीतून या कामासाठी तरतूद करण्यात यावी दोन्ही प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**स. शेर अली** — २-३ वर्षापासुन नगरोत्थान योजने अंतर्गत हाती घेण्यात आलेली मुख्य रस्त्याची कामे महानगरपालिकेने आपल्या हिश्यावा वाटा न भरल्यामूळे अर्धवट राहिलेली आहे रस्त्याची अर्धवट कामे पुर्ण करण्यासाठी अदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी.

**विनय पाटील** — शहरात कोटयावधी रुपयाची कामे करण्यात आली परंतु सिडको हडको भागात विकास कामाचे प्रस्ताव आले की त्यास विरोध करण्यात येतो या प्रस्तावास शिवसेना ,एमआयएमचा विरोध आहे काय

**आनंद चव्हाण** — सिडको भागातील हा महत्वाचा रस्ता असुन तो अत्यंत खराब झालेला आहे त्यामूळे या रस्त्याच्या कामासाठी मान्यता देण्यात यावी.

**अशोक उमरेकर** — स्नेहाताई पांढरे यांच्या प्रभागात शासनाने दिलेल्या निधीतून कामे करण्यासाठीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**प्रमोद खेडकर** स्नेहाताई पांढरे यांनी आपल्या प्रभागात विकास कामे करण्यासाठी मोठी मेहनत घेवून शासनाकडून निधी मंजुर करुन आणलेला आहे त्यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**दिपकसिंह रावत** स्नेहाताई पांढरे या कॉग्रेसच्या नगरसेविका असतांनाही त्याच्या प्रभागात विकासाची कामे करण्यासाठी कॉग्रेस पक्षाचे नगरसेवक विरोध करीत आहेत. आमची विनंती आहे की स्नेहा पांढरे यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**विरेंद्रसिंध गाडीवाले** महापौरानी प्रभाग क्र. ५ मधील दोन्ही नगरसेवकांना बोलावून त्यांचेशी चर्चा करुन हा प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा.

**अ.सत्तार** सिडको हडको भागातील मुख्य रस्त्याचे डांबरीकरणासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आलेली असून प्रशासना मार्फत प्रस्ताव आलेला असल्यामूळे प्रशासनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.तसेच नगरसेवकांच्या शिफारशीनूसार प्रत्येक प्रभागात २५-२५ लक्षाची तरतूद करण्यात आलेली असून त्या शिर्षकातील तरतूद कमी करण्यात येवू नये स्वतंत्र शिर्षक ठेवण्यात यावे.

**महापौर** प्रभाग क्र. क्र.५ मधून निवडून आलेले कॉग्रेस पक्षाचे स.सदस्या सौ.स्नेहा पांढरे व स.सदस्य श्री आनंद चव्हाण यांचेशी चर्चा करुन त्यांचे प्रभागात शासन निधीतून विकास कामे करण्याचा प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात येईल. सिडको हडको भागातील मुख्य रस्त्याचे आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार लातूर फाटा ते वसंतराव नाईक कॉलेज सिडको पर्यत बि.टी.रस्ता करण्यासाठी रु.२.८३,८५,९००/- ची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.८९** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीत लातूर फाटा ते वसंतराव नाईक कॉलेज सिडको पर्यत बीटी रस्ता करणेसाठी उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन सदर काम तातडीने पुर्ण करणे गरजेचे असल्यामूळे आवश्यक बाबीचा समावेश करुन जिल्हा दर सुचि २०१४-२०१५ नुसार रु. २,८३,८५,९००/- चे अंदाजपत्रक सादर केले आहे.सदर कामासाठी लागणारा खर्च रु. रु.२,८३,८५,९००/- यास प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२**

नांदेड शहरातील घनकचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीने प्लास्टीक प्रोसेसिंग युनिट स्थापन करणे व नांदेड शहरातील घन कचरा व्यव्व्थापनाच्या दृष्टीने किचन वेस्ट स्पेशल बायोगॅस प्रकल्प उभारणे या कामासाठी जिल्हा वार्षीक योजने मध्ये नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत या कामांना प्रशासकीय मान्यता प्रत्येकी रु.१५० लक्ष प्रति काम असे एकूण रु.३०० लक्षाच्या निधीस मान्यता प्राप्त झालेली आहे. या दोन प्रकल्पाची अंमलबजावणी करणेसाठी प्राप्त निधीतील निधी कमी पडल्यास १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून या योजनेतील कामावर खर्च करण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर

**दिपकसिंह रावत** नांदेड जिल्हयाचे पालकमंत्री मा.ना.श्री दिवाकरजी रावते साहेबांनी कोणताही पक्ष मतभेद न करता डिपीडिसीच्या माध्यमातून महानगरपालिकेस रु.३०० लक्षाचा निधी उपलब्ध्द करुन दिला त्याबदल मी त्यांचे अभिनंदन करतो तसेच हा निर्णय घेण्यासाठी नांदेड दक्षिणचे आमदार श्री हेमतभाऊ पाटील, आमदार श्री प्रतापराव पाटील चिखलीकर यांचेही खुप मोठे सहकार्य मिळाले आहे त्यांचेही मी अभिनंदन करतो. आयूक्त साहेबांना व महापौर साहेबांना विनंती आहे तात्काळ हे काम हाती घेवून लवकरात लवकर हे काम पुर्ण करावे.

**स.शेर अली** अनेक दिवसापासून जून्या नांदेड शहरात अग्नीशमन केद्र सुरु करण्याची मागणी करण्यात येत आहे परंतु अद्याप अग्नीशमन कैंद्र सुरु करण्यात आलेले नाही. जुन्या शहरात लहान लहान बोळी असून दाट लोकवस्ती असल्यामूळे विविध कारणामूळे आग लागण्याचे प्रमाणे वाढलेले आहे. सध्याचे अग्नीशमन केद्र दुर असल्यामूळे जून्या नांदेड शहरात अग्नीशमन वाहन येण्यास उशिर होतो त्यामूळे नागरीकांचे नुकसान मोठया प्रमाणात होत आहे. १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून जून्या नांदेड भागात अग्नीशमन केद्र सुरु करण्यात यावे.काही दिवसापुर्वी मंढई भागात घरास आग लागली होती अग्नीशमन अधिकारी श्री पाशा व त्यांच्या अधिनस्त कर्मचा-यांनी जिवावर उदार होवून जिवित हानी होवू दिली नाही. घरातील नागरीकांना वाचविलेले आहे त्यामूळे आयुक्तांना विंनती आहे की., अग्नीशमन विभागातील कर्मचा-यांना प्रोत्साहन म्हणून एक अतिरिक्त वार्षीक वेतनवाढ मंजुर करावी.

**दिपकसिंह रावत** माझ्या प्रभागातील चिरागअली गल्ली भागात अचानक आग लागली होती त्याठिकाणी अग्नीशमन विभागातील अधिकारी कर्मचा-यांनी तत्परता दाखवून नागरीकाचे जिव वाचविले होते म्हणून दक्षिण नांदेडचे आमदार श्री हेमतभाऊ पाटील यांनी अग्नीशमन विभागातील कर्मचा-यांना रोख स्वरुपात प्रत्येकी ५००/- याप्रमाणे बक्षिसाचे वाटप केले होते. जुन्या नांदेड भागाकरीता लवकरात लवकर एक अग्नीशमन केंद्र सुरु करण्यात यावे. अग्नीशमन विभागातील कर्मचा-यांना बक्षिस देण्यात यावे.

**विरेद्रसिंघ गाडीवाले** मागील आयुक्तांनी मागील पाच वर्षात १३ व्या वित्त आयोगाकडून प्रात झालेल्या निधीतून कोणती कामे घ्यावयाची याबाबत निर्णय घेण्यासाठी सर्व साधारण सभेत प्रस्ताव न आणता आपल्या मर्जीने खर्च केलेला आहे व त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात यावी असा प्रस्ताव आलेला.आयुक्त श्री सुशिल खोडवेकर यांनी मात्र शासन निर्देषाप्रमाणे १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करावयावयाच्या कामाचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर केले त्याबदल मी त्यांचे अभिनदन करतो. जिल्हयाचे पालक मंत्री मा.ना.श्री दिवाकररावजी रावतेसाहेबांनी डिपीडीसीतून रु. ३ कोटीचा निधी दिला त्याबध्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येते. नांदेड शहरात सिसिटिव्ही बसविण्यासाठी तत्कालिन पालकमंत्री आ.श्री डि. पी.सावंत यांनी डिपीडीसीच्या माध्यमातून सुरवातीला २.५० कोटीचा निधी दिली परंतु त्यामध्ये सिसिटिव्ही बसविण्याचे काम होत नसल्यामूळे रु.४.५० कोटीचा निधी दिला पुन्हा खर्चात वाढ झाल्यामूळे ६.०० कोटीचा निधी दिलेला आहे. घनव्यवस्थापन अंतर्गत दोन प्रोसेसिंग युनिट सुरु करण्यासाठी किती खर्च येईल याचा सविस्तर डिपीआर तयार केला वाढीव खर्च येत असेल सिसिटिव्ही प्रमाणे डिपीडिसीकडून वाढीव निधी देण्यासाठी पालकमंत्री यांना विनंती करता येईल.किंवा स्थानिक आमदार,खासदार यांचे निधीतून निधी उपलब्ध्द करुन घेता येईल त्यामूळे या प्रकल्पाचा अंदापत्रकासह सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन तो सर्वसाधारण सभे समोर ठेवण्यात यावा.डिपीआर३०० लक्षापेक्षा अधिक झालातर वाढव खर्चाचा निधी मंजुर करण्यासाठी डिपीडिसीला विनंती करता येईल.

**संजय मोरे** वसरणी भागात जेएनएनसुआएम योजने अंतर्गत मलनिस्सारण लाईन टाकण्यात आलेली आहे परंतु रिस्टोरेशन अंतर्गत रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी निधी आलेला नसल्यामूळे रस्ता दुरुस्तीचे काम होत नाही माझी विनंती आहे की १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून या रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी.

**स.शेर अली** जुन्या नांदेड भागाकरीता तात्पुरते टिनशेड टाकून अग्नीशमन केंद्र सुर करण्यात यावे.

**विरेद्रसिंघ गाडीवाले** जून्या नांदेड शहराकरीता अबचलनगर भागात नविन अग्नीशमन केंद्र सुरु करण्याबाबत चर्चा झालेली आहे त्यामूळे त्या ठिकाणी अग्नीशमन केंद्र सुरु करणेसाठीचा प्रस्ताव पुढील सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

**महापौर** सविस्तर डि.पी.आर तयार करुन प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. ९०** **ठराव**

. नांदेड शहरातील घनकचरा वयवस्थापनाच्या दृष्टीने प्लास्टीक प्रोसेसिंग युनिट स्थापन करणे व नांदेड शहरातील घन कचरा व्यव्व्थापनाच्या दृष्टीने किचन वेस्ट स्पेशल बायोगॅस प्रकल्प उभारणे या कामासाठी जिल्हा वार्षीक योजने मध्ये नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत या कामांना प्रशासकीय मान्यता प्रत्येकी रु.१५० लक्ष प्रति काम असे एकूण रु.३०० लक्षाच्या निधीस मान्यता प्राप्त झालेली आहे. या दोन्ही प्रकल्पाची अंमलबजावणी प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प आराखडा (डिपीआर) तयार करुन त्यासह हा प्रस्ताव सर्वसाधारण सभे ठेवण्यात यावा असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.३**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनावर भर देण्यात आलेला असून वैयक्तीक शौचालय बांधकामे उघडण्यावर शौचालयास जाण्यसाठी करावयाचे आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना व महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय व परिपत्रकानूसार घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे,प्रकल्प अहवालानूसार प्रकल्पाची निविदा काढणे काढणे व अंतिम करणे,व कामाचे आदेश देणे, कामास सुरवात करणे, व प्रकल्प चालविणे या बाबीचा समावेश आहे. या कामासाठी महाराष्ट्र शासनाने १४ व्या वित्त आयोगातून निधी उपलब्ध्द उपलब्ध्द करुन दिलेला असून १४ व्या वित्त आयोगाच्या निधी अंतर्गत कामांच्या प्रस्तावांना प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार महानगरपालिकेच्या बाबतीत संबंधित महानगरपालिकेच्या आयुक्तांना असतील असे निर्देश दिले असून त्यात स्थानिक नागरी स्वराज्य सर्वसाधारण सभेच्या ठरावान्वये संबंधित कामाची शिफारस केली असावी असे निर्देश दिलेले आहेत.

घनकचरा व्यवस्थापनासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, यासाठी निविदा मागविणे अंतिम करणे ,प्राप्त होणा-या प्रकल्प अहवालानूसार प्रकल्प उभारणेसाठी निविदा अंतिम करणे,कामाचे आदेश देणे,प्रकल्प चालवणे या कामासाठी सर्व प्रशासकीय कार्यवाही करणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर. या खर्चास १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून खर्च करण्याची व सर्व प्रशासकीय कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सादर.

**बालाजी कल्याणकर** शहरात विविध भागातील बाजारपेठात सार्वजनिक शौचालय नसल्यामूळे नागरीकांना व्यापा-यांना मोठी अडचण होत आहे त्यामूळे विविध भागात सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्यात यावे. वर्कशॉप पाण्याच्या टाकीजवळही सार्वजनिक शौचालयाची आवश्यकता आहे त्याठिकाणी सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्यात यावे.

**आयुक्त** शहरात विविध भागात महत्वाच्या ठिकाणी बीओटी तत्वावर सार्वजनिक शौचालयाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या निर्णयासाठी सादर करण्यात आलेला आहे त्यावर सभागृहाने निर्णय घ्यावा.

**सुंदरलाल गुरुखुदे** जून्या भागात व्यापारी संकुले आहेत,भाजीपाला मार्केट आहे. इतवारा भागात आठवडी बाजार भरतो त्यामुळे जुन्या भागातही सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्यात यावे.

**महापौर** सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करताना एकाच ठिकाणी महिला व पुरुषासाठी बांधकाम करण्यात येवू नये महिलासाठी वेगळे स्वतंत्र सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्यात यावे.सर्व स. सदस्यांच्या सुचना विचारात घेवून सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्यात यावे.

**अ.सत्तार** १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतील ५० टक्के खर्च हा घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत खर्च करण्याचे बंधन आहे. त्यामूळे घनकचरा व्यवस्थापनासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल खर्चाच्या अंदाजपत्रकासह (डिपीआर) तयार करुन तो सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात यावा म्हणजे आपणास १४ व्या वित्त् आयोगाच्या निधीतून किती निधी द्यावयाची ते समजू शकेल. डिपीआर तयार करण्यासाठी लागणा-या खर्चास मान्यता देण्यात यावी.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले**. माजी महापौर श्री अ.सत्तार यांनी सुचविल्याप्रमाणे डिपीआरसह हा प्रस्ताव ठेवण्यात यावा. त्यावर स.सदस्यांनी सुचविलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.

**आयुक्त** केंद्र शासनाची योजना आहे या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी प्रशासनाकडून नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात येईल.

**महापौर** श्री अ.सत्तार यांनी सुचविल्याप्रमाणे खर्चाच्या अंदाजपत्रकासह सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन तो सर्वसाधारण सभे समोर ठेवण्यात यावा त्यावर सभागृह निर्णय घेईल.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येते

**ठराव क्र.९१** **ठराव**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनावर भर देण्यात आलेला असून वैयक्तीक शौचालय बांधकामे उघडण्यावर शौचालयास जाण्यासाठी करावयाचे आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना व महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय व परिपत्रकानूसार घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे,प्रकल्प अहवालानूसार प्रकल्पाची निविदा काढणे काढणे व अंतिम करणे,व कामाचे आदेश देणे, कामास सुरवात करणे, व प्रकल्प चालविणे या बाबीचा समावेश आहे. या कामासाठी महाराष्ट्र शासनाने १४ व्या वित्त आयोगातून निधी उपलब्ध्द उपलब्ध्द करुन दिलेला आहे ,करीता घनकचरा व्यवस्थापनासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डिपीआर) खर्चाच्या अंदाजपत्रकासह तयार करुन प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर ठेवण्यात यावा त्यांनतर सर्वसाधारण सभेत स.सदस्यानी केलेल्या सुचनेनुसार पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात यावी असेही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते तसेच प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी लागणा-या खर्चासही प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.४**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची स्थापना दि. 26 मार्च 1997 रोजी वाघाळा नगरपालिकेचा नांदेड नगरपरिषदेत समावेश करुन झालेली आहे.

याद्वारे नांदेड शहराचे जूने विकास योजना क्षेत्र वगळून वाढीव क्षेत्रामध्ये खालील गावांचा समावेश झालेला आहे.

मौ. वाघाळा,
मौ. असदवन,
मौ. फत्तेजंगपुर,
मौ. आसरजन,
मौ. वसरणी,
मौ. रहिमपुर,
मौ. कौठा,
मौ. म्हाळजा,
मौ. जंगमवाडी (भागश:)
मौ. सांगवी (भागश:)

तद्नंतर दि.1 जूलै 2009 रोजी मौ. तरोडा (खु.) व मौ. तरोडा (बु.) या गावांचा व दि. 20 ऑगस्ट 2009 मौ. ब्रम्हपूरीच्या उर्वरित भागाचा समावेश करण्यात महानगरपालिका हद्दीत झालेला आहे. यापूर्वी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्व साधारण सभा ठराव क्र. 132, दि. 30.12.2010 अन्वये वाढीव क्षेत्र तसेच नव्याने सामाविष्ट झालेल्या क्षेत्राची विकास योजना एकत्रितरित्या तयार करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 21 (3) व कलम 23 (1) नूसार इरादा प्रसिध्द करण्याचा व वाढीव हद्दीसाठी विकास योजना तयार करणे करिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 21 (3) नूसार मनपास मूदतवाढ ही मिळणे करिताचा प्रस्ताव नांदेड वाघाळा

शहर महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव व तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 24 अन्वये सहाय्यक संचालक, नगर रचना, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांची नगर रचना अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यास व जाहीर क्षेत्राचा विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करणेकामी खाजगी एजन्सीची नेमणूक करण्यासाठी ठराव पारीत झालेला आहे.

तसेच, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्व साधारण सभा ठराव क्र. 56 दि. 08.08.2011 अन्वये वाढीव क्षेत्र तसेच नव्याने सामाविष्ट झालेल्या क्षेत्राची विकास योजना एकत्रितरित्या तयार करण्यासाठी शासन स्तरावर नगर रचनाकार यांच्या अधिपत्याखाली विकास योजना विशेष घटकाची स्थापना करणे तसेच, नव्याने सामाविष्ट झालेल्या क्षेत्राची विकास योजना तयार करण्यासाठी सहाय्यक संचालक नगर रचना, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांची `नगर रचना अधिकारी` म्हणून नेमणूक करण्यासाठी पारीत करण्यात आलेला होता.

मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पत्र क्र. 4013 दि. 30.06.12 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेसाठी विकास योजना, विशेष घटकासाठी विविध संवर्गातील एकूण 18 अस्थायी पदांची आवश्यकता असून उपसंचालक, नगर रचना, यांचे अधिपत्याखाली विविध संवर्गातील अस्थायी 18 पदांचे विकास योजना विशेष घटक कार्यालय कार्यान्वित करणे आवश्यक असून कार्यालयातील कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन व भत्ते विषयक येणारा वार्षिक किमान अंदाजित खर्च रु. 87,54,300/- करण्यास व सदर कार्यालयास जागा, वाहन, दूरध्वनी, संगणक, स्टेशनरी, फर्निचर इ. आवश्यक बाबींची पुर्तता करण्यास तयार असल्याबाबत महानगरपालिकेचा सर्व साधारण सभेचा ठराव पारीत करुन पाठवणे बाबत कळविले आहे. त्यानूसार महानगरपालिकेने सर्व साधारण सभा ठराव क्र. 98 दि. 22.08.12 पारित केलेला आहे. त्याबात मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यानूसार महाराष्ट्र शासन निर्णय क्र. टिपीव्ही-2314/305/प्रक्र 59/14/नवि 27 दि. 06.12.14 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्यासाठी उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, (झालर क्षेत्र), या अस्थापनावरील विविध संवर्गातील एकूण 18 अस्थाई पदासह दि. 01.01.2015 पासून उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका म्हणून स्थलांतरीत करण्यात आलेले आहे. सदरचे कार्यालय शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह (स्टेडीयम) येथे कार्यान्वित झालेले आहे.

शासन अधिसुचना क्र. टिपीएस-1810/83/प्र.क्र. 2115/10/ नवि13 दि. 27.07.2011 च्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 23 खाली इरादा जाहीर केल्याच्या दिनांकापासून अडीच वर्षात कलम 26 प्रमाणे प्रारुप विकास योजना प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तथापि, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सदरील मुदत संपलेली असून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 24 अन्वये विकास योजना तयार करण्यासाठी अद्यापपर्यंत नगर रचना अधिकारी यांची नेमणूक सुध्दा झालेली नाही. अशा परिस्थितीत, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची विकास योजना तयार करण्याबाबतचा इरादा नव्याने प्रसिध्द करावा किंवा कसे याबाबत मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शन अपेक्षिलेले असता, मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पत्र क्र. 667 दि. 05.02.14 च्या पत्रात नव्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 34 सह कलम 23 अंतर्गत विकास योजना तयार करणेबाबतचा इरादा जाहीर करणे योग्य राहील असे मत शासनास दिलेले आहे. त्यामूळे वैधानिक बाबी पूर्ण होत नसल्यामूळे पुर्वीचा ठराव रद्द करणे आवश्यक आहे.

त्यानूसार, मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे शासनास पत्र क्र. 667 दि. 05.02.14 च्या अनुषंगाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या नव्याने सामाविष्ट भाग व वाढीव क्षेत्राची विकास योजना (जूने मंजूर विकास योजना क्षेत्र वगळून) तयार करणेकामी नव्याने महाराष्ट्रप्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 34 सह कलम 23 अंतर्गत विकास योजने तयार करणेबाबतचा इरादा जाहीर करणे व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 24 अन्वये उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक यांची नगर रचना अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यासाठीचा प्रस्ताव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**महापौर** आयुक्तांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. ९२** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची स्थापना दि. 26 मार्च 1997 रोजी वाघाळा नगरपालिकेचा नांदेड नगरपरिषदेत समावेश करुन झालेली आहे.

याद्वारे नांदेड शहराचे जूने विकास योजना क्षेत्र वगळून वाढीव क्षेत्रामध्ये खालील गावांचा समावेश झालेला आहे.

मौ. वाघाळा,
मौ. असदवन,
मौ. फत्तेजंगपुर,
मौ. आसरजन,
मौ. वसरणी,
मौ. रहिमपुर,
मौ. कौठा,
मौ. म्हाळजा,
मौ. जंगमवाडी (भागश:)
मौ. सांगवी (भागश:)

तद्नंतर दि.1 जूलै 2009 रोजी मौ. तरोडा (खु.) व मौ. तरोडा (बु.) या गावांचा व दि. 20 ऑगस्ट 2009 मौ. ब्रम्हपूरीच्या उर्वरित भागाचा समावेश करण्यात महानगरपालिका हद्दीत झालेला असल्यामूळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्व साधारण सभा ठराव क्र. 132, दि. 30.12.2010 अन्वये वाढीव क्षेत्र तसेच नव्याने सामाविष्ट झालेल्या क्षेत्राची विकास योजना एकत्रितरित्या तयार करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 21 (3) व कलम 23 (1) नूसार इरादा प्रसिध्द करण्याचा व वाढीव हद्दीसाठी विकास योजना तयार करणे करिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 21 (3) नूसार मनपास मूदतवाढ ही मिळणे करिताचा प्रस्ताव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव व तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 24 अन्वये सहाय्यक संचालक, नगर रचना, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांची नगर रचना अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यास व जाहीर क्षेत्राचा विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करणेकामी खाजगी एजन्सीची नेमणूक करण्यासाठी ठराव पारीत करण्यात आलेले आहे .

शासन अधिसुचना क्र. टिपीएस-१८१०/८३/प्र.क्र. २११५/१०/ नवि१३ दि. २७.०७.२०११ च्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ खाली इरादा जाहीर केल्याच्या दिनांकापासून अडीच वर्षात कलम २६ प्रमाणे प्रारुप विकास योजना प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तथापि, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सदरील मुदत संपलेली असून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये विकास योजना तयार करण्यासाठी अद्यापपर्यंत नगर रचना अधिकारी यांची नेमणूक सुध्दा झालेली नाही. अशा परिस्थितीत, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची विकास योजना तयार करण्याबाबतचा इरादा नव्याने प्रसिध्द करावा किंवा कसे याबाबत मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शन अपेक्षिलेले असता, मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पत्र क्र. ६६७ दि. ०५.०२.१४ च्या पत्रात नव्याने
महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 34 सह कलम 23 अंतर्गत विकास योजना तयार करणेबाबतचा इरादा जाहीर करणे योग्य राहील असे मत शासनास दिलेले आहे. त्यामूळे वैधानिक बाबी पूर्ण होत नसल्यामूळे पुर्वीचा ठराव रद्द करणे आवश्यक आहे.

करीता मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे शासनास पत्र क्र. 667 दि. 05.02.14 च्या अनुषंगाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या नव्याने सामाविष्ट भाग व वाढीव क्षेत्राची विकास योजना (जूने मंजूर विकास योजना क्षेत्र वगळून) तयार करणेकामी नव्याने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 34 सह कलम 23 अंतर्गत विकास योजने तयार करणेबाबतचा इरादा जाहीर करण्यास व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 24 अन्वये उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक यांची नगर रचना अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यास ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.तसेच यासंदर्भात झालेले पुर्वीचे ठराव रध्द करण्यासही ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र .५** **प्रस्ताव**

कै. श्री सय्यद महेमुद स. करीम हे मनपाकेत लिपीक या पदावर कार्यरत होते. संबंधीतास नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ नियम भाग ३ (शिक्षा आणि शिस्तभंग विषयक प्राधिकरणे) नियम ५ (१) मधील मोठ्या शिक्षा नियम सात मधील तरतुदीनुसार कार्यालयीन आदेश क्र.नांवशमनपा/ साप्रवि/आस्था-४/७९३६/१३ दि. २०.०७.२०१३ अन्वये सेवेतून सक्तीने सेवा निवृत्त करण्यात आले होते व नंतर त्यांचे दिनांक १५.०३.२०१४ रोजी निधन झालेले असल्यामुळे व त्यांच्या कुटूंबात त्यांच्या शिवाय कोणीही कमावणारा व्यक्ती नसल्यामुळे त्यांच्या कुटूंबावर उपासमारीची वेळ आलेली आहे करिता सहानुभुतीच्या व माणुसकीच्या दृष्टीकोणातुन कै. श्री सय्यद महेमुद स. करीम लिपीक यांच्या जागेवर त्यांचा
मुलगा नामे स. लायख पिता स. महेमुद यांना अनुकंपा धर्तीवर नेमणुक करण्यास ही मनपा सर्व साधारण सभा सर्वानुमते मान्यता देते,व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक :-** शफि अहेमद कुरेशी २) अ.सत्तार अ.गफुर **अनुमोदकः-** हसिना बेगम साबेर चाऊस,आनंद चव्हाण, सौ.सुदर्शना खोमणे

**<u>प्रशासकिय टिपपणी</u>**

सय्यद महेमुद स. करीम हे मनपा कार्यालयात लिपीक या पदावर कार्यरत होते. त्यांना कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/ साप्रवि/आस्था-4/7976/2013 दि.20.0.2013 च्या आदेशान्वये दि.20.07.2013 सक्तीने सेवानिवृत करण्यात आले. संबंधिताचे दि.15.03.2014 रोजी निधन झाले. संबांधित हे दिनांक 17.08.2012 पासुन कोणत्याही प्रकारची मौखीक अथवा लेखी सुचना किंवा रजेचा अर्ज सादर न करता विनापरवानगी अनधिकृतरित्या कामावर गैरहजर असल्याचा प्राप्त अहवाल व त्यांच्या संपुर्ण सेवा कालावधीतील नियुक्ती पासुनच त्यांच्या कर्तव्याबाबत एकनिष्ठ नसल्याचे तसेच संबंधितास वारंवार संधी देऊनही त्याचे वर्तनात कोणतीच सुधारण होत नसल्याने संबंधितास महानगरपालिका सेवेत ठेवणे मनपाच्या हितोच नसल्यामुळे मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम 1949 चे कलम 56 अन्वये सेवेतून बडतर्फ करण्यात येईल, अशी नोटीस बजावण्यात आली होती. परंतु संबंधिताने सदरील नोटीसीच्या अनुषगांने कोणत्याही प्रकारचा खुलासा सादर केला नसल्यामुळे संबंधीतास निलंबित करण्यात आले होते. निलंबन प्रकरणी संबंधिता विरुध्द विभागीय चौकशी आरंभिण्यासाठी संबंधितास ज्ञापन व दोषारोप जोडपत्र 1 ते 4 बजावण्यात आले. त्याअनुषंगाने संबंधितांनी खुलासा सादर करुन त्यांच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप मान्य केले होते.

त्यामुळे संबंधिताच्या एकुण सेवा कालावधीचा विचार करता उपरोक्त प्रमाणे संबंधितास वारंवार संधी देऊनही त्यांच्या वर्तनात कोणतीही सुधारणा झाल्याने दिसुन येत नसल्यामुळे तसेच संबंधितास मनपा सेवेत ठेवणे मनपाच्या हिताचे नसल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम 1979 नियम भाग 3 (शिक्षा आणि शिस्तभंग विषयक प्राधिकरणे) नियम 5 (1) मधील मोठ्या शिक्षा नियम सात मधील तरतुदीनुसार

कार्यालयीन आदेश क्र.नांवशमनपा/साप्रवि/आस्था-4/7936/13 दि.20.07.2013 अन्वये दि.20.07.2013 पासून सेवेतून सक्तीने सेवा निवृत्त करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक अकंपा-1004/प्र.क्र.51/2004/आठ मंत्रालय मुंबई-32 दि.22 ऑगस्ट 2005 नुसार केवळ सेवेत कार्यरत असतांना दिवंगत झालेल्या गट क व ड च्या कर्मचा-यांच्या पात्र कुटूबियांनाच अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय आहे. श्री स. महेमुद स. करिम, लिपीक यांना दि.20.07.2013 रोजी सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आलेले आहे. लिपीक या संवर्गातील सेवानिवृत्त अथवा सक्तीने सेवानिवृत्त केलेल्या कर्मचा-यांच्या पाल्यास अनुकंपा तत्वावर नेमणूक देण्याची तरतुद नाही.

श्री स. महेमुद स. करिम, लिपीक यांना दि.20.07.2013 रोजी सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आले होते. व त्यांना सक्तीने सेवानिवृत्त केल्यानंतर जवळपास 1 वर्ष 8 महिन्यानंतर दि.15.03.2014 रोजी मृत्यू पावले आहेत. करिता त्यांच्या पाल्यास अनुकंपा धर्तीवर नेमणूक देण्याची तरतुद नाही.

**शफि अहेमद कुरेशी** महानगरपालिकेच्या सेवेत कार्यरत असतांना ज्या कर्मचा-यांना अकाली मृत्यू झालेल्या आहे अशा कर्मचा-यांचे कुंटूंबियाचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन त्यांच्या पाल्याना अनुकंपाधर्तीवर मनपा सेवेत घेतलेले आहेत त्यामूळे या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**आयुक्त** महानगरपालिका अधिनियमात व शासन निर्णयात लिपीक या संवर्गातील सेवानिवृत्त अथवा सक्तीने सेवानिवृत्त केलेल्या कर्मचा-यांच्या पाल्यास अनुकंपा तत्वावर नेमणूक देण्याची तरतुद नाही.त्यामूळे प्रस्तावानुसार सबंधित कर्मचा-याच्या पाल्यास अनुकंपाधर्तीवर नेमणूका देता येणार .

**शफि अहेमद कुरेशी** सर्वसाधारण सभेस ठराव घेण्याचे अधिकार आहे आम्ही प्रस्तावास मान्यता देतो.

**महापौर** स.सदस्याचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी ठरावा प्रमाणे कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. ९३** **ठराव**

कै. श्री सय्यद महेमुद स. करीम हे मनपाकेत लिपीक या पदावर कार्यरत होते. संबंधीतास नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ नियम भाग ३ (शिक्षा आणि शिस्तभंग विषयक प्राधिकरणे) नियम ५ (१) मधील मोठ्या शिक्षा नियम सात मधील तरतुदीनुसार कार्यालयीन आदेश क्र.नांवशमनपा/ साप्रवि/आस्था-४/७९३६/१३ दि. २०.०७.२०१३ अन्वये सेवेतून सक्तीने सेवा निवृत्त करण्यात आले होते व नंतर त्यांचे दिनांक १५.०३.२०१४ रोजी निधन झालेले असल्यामुळे व त्यांच्या कुटूंबात त्यांच्या शिवाय कोणीही कमावणारा व्यक्ती नसल्यामुळे त्यांच्या कुटूंबावर उपासमारीची वेळ आलेली आहे करिता सहानुभुतीच्या व माणुसकीच्या दृष्टीकोणातुन कै. श्री सय्यद महेमुद स. करीम लिपीक यांच्या जागेवर त्यांचा मुलगा नामे स. लायख पिता स. महेमुद यांना अनुकंपा धर्तीवर नेमणुक करण्यास ही मनपा सर्व साधारण सभा सर्वानुमते मान्यता देते, आयुक्तानी ठरावा प्रमाणे कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र. ६** **प्रस्ताव**

दि.११.११.२०१५ रोजी स्वयंवर प्रतिष्ठान व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिवाळी पहाट या गायनाचा सांस्कृतीक कार्यक्रमास नांदेड महानगरपालिकेतर्फे रु.५०,०००/- पर्यत खर्चास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**सुचक** :- स.विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- शफि अहेमद कुरेशी

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.९४** **ठराव**

दि.११.११.२०१५ रोजी स्वयंवर प्रतिष्ठान व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिवाळी पहाट या गायनाचा सांस्कृतीक कार्यक्रमास नांदेड महानगरपालिकेतर्फे रु.५०,०००/- पर्यत खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र. ७** **प्रस्ताव**

नांवामनपा हध्दीतील ब्रम्हपुरी येथील बिएसयुपी अंतर्गत कामाची चर्चा करणे

**सुचक** :- अ.हबीब अब्दुल रहिम बागवान **अनुमोदक** :- शेख हबीब

**अ.हबीब** ब्रम्हपुरी भागात सहा महिण्यापासुन बिएसयुपीचे कामे का बंद आहे. कामे मंजुर असूनप संबंधित कत्राटदार कामे पुर्ण का करीत नाही. ते विहित कालावधीत काम पुर्ण करीत नसल्यामूळे त्यांना किंती दंड आकारण्यात आला याची माहिती देण्यात यावी.

**आयुक्त** ब्रम्हपुरी भागात बिएसयुपी योजने अतर्गत करावयाचे कामासाठी सल्लागार म्हणून अपिल कंन्सलटटसी यांची नेमणूक करण्यात आलेली असून अपिल कन्सलटंटसीचा अहवाल आल्याशिवाय आपणास याविषयावर चर्चा करता येणार नाही. अपिल कन्स.याचे ओपिनियमन घेवून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**अ.हबीब** सहा महिण्यापासुन कामे का बदं आहेत, सहा महिण्यापासुन ओपिनयन का घेण्यात आलेले नाही.याचा खुलासा करण्यात यावा.

**अ.सत्तार** मलनिस्सारण लाइन टाकयाच्या संदर्भात वाद होत आहे.

**आयुक्त** ब्रम्हपुरी भागातील बिएसयुपीचया कामाची स्थळ पाहणी करुन जी जी कामे करणे आववश्यक आहे ती कामे येत्या तीन महिण्यात पुर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**महापौर** आयुक्तांनी ब्रम्हपुरी भागात बिएसयुपी योजने अंतर्गत चालू असलेल्या कामाची स्थळ पाहणी करुन अर्धवट कामे विहित कालावधीत कामे पुर्ण करण्यासाठी संबंधित कत्राटदारास निर्देष द्यावते.

**ठराव क्र.९५** **ठराव**

आयुक्त नांवामनपा नांदेड यांनी ब्रम्हपुरी येथे बिएसयुपी अंतर्गत चालू असलेल्या घराचे बांधकामाची व मुलभूत नागरी सुविधाचे कामाची स्थळ पाहणी करुन जी अर्धवट कामे आहेत ती तातडीने तीन महिण्याच्या आंत पुर्ण करण्यासाठी संबंधित कत्राटदाराना आदेशित करण्यात यावे असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**<u>विशेष बाब म्हणून आयत्या वेळेस घेण्यात आलेला तातडीचा प्रस्ताव</u>**

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** सालसन २००८ मध्ये महासभा, स्थायी समिती सभा ,विशेष समित्या/प्रभाग समिती सभेकरीता उपस्थित असणा-या नगरसेवकांना व अधिकारी कर्मचा-यांना अल्पोपहर खर्चाची जी मर्यादा ठरवुन दिली होती परंतु सध्याची महागाई लक्षात घेता सदरील खर्चाची मर्यादा कमी पडत आहे त्यामूळे महासभेसाठी रु..२५,०००/- स्थायी समिती सभेकरीता १५,०००/- व विशेष समिती सभा / प्रभाग समिती सभेकरीता रु.१०,०००/-याप्रमाणे खर्चाची मर्यादा करण्यास मान्यता देण्यात यावी व सदरील खर्च हा नगरसचिव यांना देण्यात आलेल्या अग्रीम रक्कमेतून खर्च करण्यास मान्यता देण्यात यावी.

**अ.सत्तार** श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री विरेंद्रसिंघ गाडीवाली यांनी मांडलेला प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.९६** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती सभा दिनांक २९.०३.२००८ ठराव क्रं. ३३० अन्वये सर्व साधारण सभेत अल्पोपहारा करिता रु. १०,०००/- प्रति सभा, स्थायी समिती सभेत रु. ६,०००/- प्रति सभा, व विशेष समित्या प्रति सभा रुपये ४,०००/- या प्रमाणे खर्च करण्यासाठी मान्यता दिली होती. तथापि, मनपा सर्व साधारण सभा अथवा विशेष सभा असल्यास सदरील सभेस उपस्थित असलेल्या स. सदस्य/सदस्या, सर्व विभाग प्रमुख, कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी बोलविण्यात आलेल्या पोलीस अधिकारी कर्मचारी यांना अल्पोपहार पुरविण्यात येत असल्यामूळे सध्याचे बाजारातील अल्पोपहाराचे दर लक्षात घेता वरील प्रमाणे निश्चित करण्यात आलेली खर्चाची मर्यादा अल्पोपहारास कमी पडत आहेत. त्यामुळे खालील प्रमाणे महानगरपालिका सभा रुपये २५,०००/-, स्थायी समिती सभा रुपये १५,०००/-, विशेष / प्रभाग समितीच्या सभा रुपये १०,०००/- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील संविधानिक सभेस उपस्थित राहणा-या सं,सदस्यांना ,अधिकारी व कर्मचा-याना अल्पोपहार पुरविण्यासाठी खर्चाची मर्यादा निश्चित करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते तसेच नगरसचिव यांना देण्यात आलेल्या स्थायी अग्रीम रक्कमेतून खर्च करण्याची प्रशासकीय मान्यता देण्यात येते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**महापौर** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामूळे आजची सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते. शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात आले.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**स्वाक्षरीत/-**
**महापौर,**
.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड